

# प्रेरणा

नूतन महाविद्यालय, सेलू,
जि. परभणी
वार्षिकांक २०११-१२









## ग्रामीण संस्कृती विशेषांक

# प्रेरणा

## नूतन महाविद्यालय, सेलू

ग्रामीण संस्कृती विशेषांक २०११-१२
वर्ष ४४ वे
अंक ४४ वा



# प्रेरणा

## नूतन महाविद्यालय, सेलू

ग्रामीण संस्कृती
विशेषांक २०११-१२





**प्रकाशक**
प्राचार्य डॉ.शरद एस.कुलकर्णी
नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी.
दूरध्वनी : ०२४५१-२२३०८०

**कार्यकारी संपादक**
प्रा.आर.ए.झोडगे
प्रा.व्ही.यु.शेप
प्रा.एस.जी.घुलेश्वर

**अक्षर जुळवणी**
प्रा.पाटील एम.एन.

**मुखपृष्ठ**
नयन बारहाते

**मुद्रक**
सतीश कुलकर्णी
मयूर प्रिंटर्स
वर्कशॉप रोड, कैलास नगर, नांदेड.





*या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ व महाविद्यालय प्रशासन सहमत असेलच असे नाही.*



**अर्पण पत्रिका**

भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलाधार
व जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी
आणि ग्रामीण विकास क्षेत्रात कार्य करणा-या
तमाम कार्यकर्त्यांना हा अंक सादर अर्पण.....

श्रद्धांजली



नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सदस्य व
कनिष्ठ महाविद्यालय स्थानिक समितीचे
अध्यक्ष आदरणीय
**श्री.सुभाषचंदजी काला**
यांना भावपूर्ण श्रद्धांजली




नूतन महाविद्यालय, सेलू

ग्रामीण संस्कृती
विशेषांक २०११-१२

**संपादक मंडळ**
मराठी विभाग

**संपादक**
शेख रुबिना खाजामियाँ

**सहसंपादक**
बुधवंत राम हनुमान
गायके एम.एन.

**हिंदी विभाग**
**संपादक**
होकर्णे अभिषेक

**सहसंपादक**
पितळे विष्णु
टेंगसे रामेश्वर तुकाराम

**इंग्रजी विभाग**
**संपादक**
गुरुबानी खुशबू के.

**सहसंपादक**
कवडे राणी
झंवर प्रियंका संतोष

**सहयोगी संपादक**
मगर स्नेहलता

# मनोगत प्राचार्यांचे.....

प्रेरणाचा ग्रामीण संस्कृती वरील अंक आपल्या हाती देत असतांना मनस्वी आनंद होत आहे. म.गांधीजीनी खेड्यांकडे चला असा संदेश दिला होता. तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागाचे महत्त्व जाणून ग्रामगीता नावाचा ग्रंथ लिहिला. खेड्यांमुळेच देशाचा आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, नैतिक इत्यादी प्रकारचा विकास होऊ शकतो हे त्यांनी तेंव्हाच प्रतिपादित केले आहे. म्हणून त्यांना 'द्रष्टापुरुष' असे संबोधले जाते. अशा महापुरुषांचा संदेश डोळ्यासमोर ठेऊन तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन सन १९६८ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. त्याची पूर्ती होत असतांना पाहून समाधान वाटते. स्थापनेपासून राष्ट्रीय सेवा योजना, साक्षरता अभियान, विविध नेत्यांच्या जन्मशताब्दींच्या माध्यमातून ग्रामीण जनतेशी संवाद साधण्याचा, त्यांच्या प्रश्नांची सोडवणुक करण्याचा प्रयत्न संस्थेने/ महाविद्यालयाने सातत्याने केलेला आहे. बहुतांशी विद्यार्थी ग्रामीण भागात राहतात. त्यांच्या भावना त्यांना समर्थपणे मांडता याव्यात यासाठी केलेला हा प्रामाणिक प्रयत्न.

प्रेरणा अंकाचे सातत्याने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई यांच्याकडून कौतुक होत आहे. महाराष्ट्राची पन्नास वर्ष या अंकाला विद्यापीठ व प्रतिष्ठानने तृतीय क्रमांकाचे बक्षीस देऊन प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे प्रत्येक अंक प्रसिध्द करताना महाविद्यालयाची जबाबदारी वाढली आहे.

याही अंकाला आपल्याकडून तितकाच प्रतिसाद मिळेल हा दृढविश्वास..
संपादक मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन.

# मराठी विभाग

# प्रेरणा

## नूतन महाविद्यालय, सेलू



ग्रामीण संस्कृती
विशेषांक २०११-१२

**संपादक**
शेख रुबिना खाजामियाँ

**सहसंपादक**
बुधवंत राम हनुमान
गायके एम.एन.

अनुक्रमणिका..


- **ग्रामीण शिक्षण व्यवस्था** - भाग्यश्री सुरेशराव मगर
- **ग्रामीण संस्कृती** - दत्ता नामदेवराव मोगल
- **ग्रामीण भागातील समस्या व उपाय योजना** - रुपाली संतोषराव पाटील
- **ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्था** - राम हनुमान बुधवंत
- **ग्रामीण जीवन** - शेख समीना अब्दुल रौफ
- **ग्रामीण जीवन : तरुणाईची घुसमट** - रुबिना शेख खाजामियाँ
- **ग्रामीण भागाचे बदलते रुप** - रेणुका गोपाळराव दीक्षित
- **ग्रामीण भागातील समस्या** - श्रीकांत गंगाधरराव जाधव
- **आधुनिक आदान-प्रदानाचे तंत्रज्ञान** - दीप्ती सुरेश कांबळे
- **ग्रामीण स्त्री** - विद्या एकनाथराव मुंजे
- **ग्रामीण स्त्री जीवन** - यशोदा रामेश्वर व्हन्डे
- **ग्रामीण भागातील अद्‌भूत चमत्कार : लोणार** - नेमिनाथ रामकिसन चांगले
- **ग्रामीण जीवनात कारख्यान्यांचे स्थान** - रामेश्वर तुकाराम टेंगसे
- **खेड्यातील सकाळ** - पांडुरंग भगवानराव ढेंगळे
- **ग्रामीण संस्कृती** - पांडुरंग ज्ञानोबा शेरे
- **शेतकरी** - श्रीकांत गंगाधरराव जाधव
- **नशीब** - अशोक शिवानंद चौधरी
- **जरा हसूया !** - एच.एस.व्ही.सी. सर्व विद्यार्थी
- **बहार** - कृष्णा नामदेवराव वाघमोडे
- **ग्रामीण संस्कृतीतील ओवी** - प्रिती सिंगारे
- **मुलाखत**



## ग्रामीण शिक्षण व्यवस्था

- भाग्यश्री सुरेशराव मगर

ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन यात फार मोठा फरक आढळतो.जसे की, घरे, आरोग्यविषयक सोयी, रस्ते व वाहतूकव्यवस्था, चरितार्थाची व करमणुकीची साधने आणि सार्वजनिक जीवन यासारख्या बाबतीत शहरांपेक्षा खेडेगावात अनेक गैरसोयी असतात. अशा गैरसोयी व जगापासून अलगपणा यामुळे ग्रामीण शिक्षणावर फार मोठा परिणाम होतो. विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षणाधिकारी, अभ्यासक्रम, शैक्षणिक प्रशासन आणि शिक्षण खर्च या सर्वांचा विचार करताना खेड्यातील वस्तुस्थितीचा विचार करणे भाग असते.

ग्रामीण शिक्षणाच्या विचाराचे स्थूलमानाने चार घटक आहेत. एक म्हणजे देशात प्रचलित असलेल्या शिक्षण पद्धतीचा ग्रामीण भागात प्रसार आणि तो करण्यातील अडचणी यात पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, औद्योगिक, महाविद्यालयीन आणि प्रौढांच्या अशा सर्व शैक्षणिक टप्प्यांचा समावेश होतो. दुसरा विचार म्हणजे शैक्षणिक तसेच शिक्षणोपयोगी अशा तंत्रासंबंधी आहे, खेड्यातील शिक्षणविषयक अडचणी दूर करुन तेथील जनतेला अधिकाधिक चांगले शिक्षण मिळण्याकरिता निरनिराळ्या तंत्राचा कसा उपयोग होईल ते पहावे. तिसरा भाग म्हणजे ग्रामीण जनतेकरिता नागरी शिक्षण पद्धतीपेक्षा निराळी अशी शिक्षणपद्धती असावी. चौथा विचार म्हणजे व्यापक ग्रामोद्धाराच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाचा उपयोग कसा करुन घेता येईल यासंबंधी आहे.

शहरांमध्ये पूर्व प्राथमिक पासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी उपलब्ध असतात. त्यांच्याशी तुलना करताना ग्रामीण भागातील सोयी अत्यंत अपु-या असतात. प्रगत आणि अप्रगत अशा दोन्ही देशात असे अंतर दिसून येते. अगदी पुढारलेल्या देशातही लहान खेडेगावात फक्त प्राथमिक शाळा आहेत.

ग्रामीण भागात चांगले शिक्षण देण्याच्या दृष्टीने अनेक अडचणी येतात. मुलांची संख्या कमी म्हणून शाळा काढता येत नाहीत आणि काढलीच तर एकाच शिक्षकाकडे सर्व इयत्ता सोपवण्यात येतात. खेड्यात जाण्यास शहरी शिक्षकांची इच्छा नसते. मुलींच्या शाळेकरिता शिक्षिका मिळू शकत नाहीत. हस्तव्यवसाय, विज्ञान, चित्रकला, गायन इ. विषयांचे खास शिक्षक मिळत नाहीत. त्याचप्रमाणे तपासनीस खेडेगावात

जाण्यास तयार नसतात. त्यामुळे देखरेख कमी राहते आणि शिक्षणाचा दर्जाही कमी होतो. इमारत, साधनसामग्री, ग्रंथालय, प्रयोगशाळा इ. शिक्षणाची साधने खेड्यात दुर्मिळ असतात.

ग्रामीण परिस्थितीचा विचार करुन, आहे त्या परिस्थितीत अधिकाधिक चांगले शिक्षण देण्याकरिता काही विशेष तंत्राचा उपयोग करता येतो.

१) तीन-चार लहान शाळा एकत्र करुन एकच मोठी केंद्रशाळा ठेवल्यास शिक्षणाचा दर्जा चांगला ठेवता येतो.

२) विद्यार्थ्यांना मध्यंतराचे जेवण, दूध, पुस्तके व कपडे इत्यादींची सोय केली तर मुलांची संख्या वाढू शकते.

३) शेतीच्या कामाचे हंगाम टाळून शाळा भरविल्यास अधिक मुले शाळेत येऊ शकतात.

४) रेडिओ, दूरचित्रवाणी इ. साधनांद्वारे विविध प्रकारचे शिक्षण खेड्यापाड्यापर्यंत पोंहचविता येते.

५) ग्रामीण भागातील काम करणा-या शिक्षकांना विशेष असे प्रशिक्षण देणे.

मागासलेल्या देशात ग्रामीण शिक्षणाच्या दोन महत्त्वाच्या समस्या असतात. एक म्हणजे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची सोय करणे. दुसरी म्हणजे आयुष्यात कधीच शिक्षण न मिळालेल्या प्रौढ ग्रामीण जनतेला साक्षरता, आरोग्य, कृषिशास्त्र, हस्तव्यवसाय सामाकि जीवन इ. विषयांचे शिक्षण देऊन सुसंस्कृत करणे. यात प्रौढ शिक्षण व ग्रामोद्धार या दोहोंची सांगड घातली जाते. ग्रामीण शिक्षणाच्या व ग्रामोद्धाराच्या समस्या पुढारलेल्या आणि मागासलेल्या राष्ट्रांनी आपापल्या परिस्थितीप्रमाणे सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिका. अमेरिका हा देश शिक्षणात पुढारलेला असला तरी ग्रामीण शिक्षणाच्या समस्या तिथेही आहेत.

महाराष्ट्रातील ग्रामीण शिक्षणाचा पहिला प्रयोग १८३६ साली झाला. त्याचप्रमाणे पूरंदर तालुक्यात शेतक-यांना लेखन, वाचन व गणित हे विषय शिकविण्याकरिता 'लेफ्टनंट शॉर्ट रोड' यांनी काही रात्रीच्या शाळा काढल्या होत्या.

पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागात उपलब्ध व्हावे म्हणून अनेक प्रयत्न झाले. काही खासगी संस्थांनी असे प्रयत्न केले. यात सातारा जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्था, कोल्हापूरची विवेकानंद शिक्षण संस्था, अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्था. याच धर्तीवर स्थापन झालेल्या लहान मोठ्या संस्थांनी महाराष्ट्रात माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यांचे जाळेच पसरलेले आहे.

महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांपैकी ८७.२ टक्के प्राथमिक शाळा आणि ५२.६ टक्के माध्यमिक शाळा ग्रामीण भागात काम करीत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण प्राथमिक शिक्षणात ६७.३४ तर माध्यमिक शिक्षणात ३१.६४ टक्के व उच्च शिक्षणात २० ते ३० टक्के असे आहे.

मध्यवर्ती सरकारच्या योजनेप्रमाणे विशेष ग्रामीण विषयांचे उच्च शिक्षण देणारी तीन ग्रामीण महाविद्यालये महाराष्ट्रात आहेत. यात गारगोटी येथील मौनी विद्यापीठ, अमरावती आणि वर्धा येथील ग्रामीण महाविद्यालये. या संस्था ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सतत कार्य करीत आहेत.

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे ग्रामीण भाग विकसित करणे व त्यासाठी ग्रामीण शिक्षण व्यवस्था प्रभावी करण्यासाठी सर्वांच्या प्रयत्नांची गरज आहे.

*मंझिले उन्हींको मिलती है।*
*जिनकी सपनों में जान होती है।*
*यहाँ पंखों से कुछ नहीं होता।*
*हौंसलों से उडान होती है।*

■



# ग्रामीण संस्कृती

- दत्ता नामदेवराव मोगल

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. येथील खेडी वैशिष्ट्यपूर्ण असून खेडयांची अशी एक संस्कृती आहे, जिला आपण ग्रामीण संस्कृती म्हणून ओळखतो. खेड्यातील माणसे प्रेमळ, कष्टाळू व प्रमाणिक असतात. खेड्यातील सकाळ सुरु होते ती वासुदेव, कुडमुडे जोशी, पांगूळ यांच्या गीतांनी. भल्यापहाटे श्रीकृष्णाची गाणी गात वासुदेव दारात येतो. तोपर्यंत महिलांनी दारात सडा शिंपडून, रांगोळी काढून अंगण सुशोभित केलेले असते. इकडे गोठ्यात गायी-वासरांच्या हंबरण्याचा आवाज, पुरुषांची दूध काढण्याची लगबग सुरु होते. पूर्वी जेव्हा पिठाची गिरणी नव्हती तेव्हा स्त्रिया जात्यावर धान्य दळत असत. दळतांना ओठात असायची ती जीवनाचे सार सांगणारी ओवी.

सूर्योदय झाल्यानंतर शेतक-यांची सकाळची न्याहारी घेऊन शेतात जाण्याची लगबग सुरु होते. ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती. शेतीवरच त्यांची उपजीविका असते. बैलगाडी जुंपून शेतकरी भल्यापहाटे शेतात जाण्याच्या तयारीस लागतात.

खेड्यांमध्ये विविध जाती-जमातीचे लोक राहतात. बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार यांच्यात पूर्वी कामाची विभागणी केलेली असे. गावातल्या गरजा गावातच भागवल्या जात. गावातच लोकांना छोटे-मोठे काम करुन पोटापुरते मिळत असे.

गावतील सर्व लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. एकमेंकाच्या सुख-दुःखात सहभागी होतात. आता वैयक्तिक वाद-विवाद तर असतातच पण कुणाचं लग्न असेल, कुणाची पंगत असेल, कुणी आजारी असेल वा कुणाचा मृत्यू झाला असेल या सर्व प्रसंगी वैयक्तिक

हेवेदावे विसरुन सर्वजण एकत्र येतात. ग्रामीण भागातील लोकांमध्ये धार्मिकता, श्रद्धा, विश्वास व परंपरा यांचे प्राबल्य असते. त्या त्या भागातील देवदेवता, संत यांची मंदिरे गावांत असतात. या देवतांच्या जत्रा, यात्रा प्रसंगी गावांत चैतन्याचे वातावरण असते. विविध जातीधर्मांचे लोक जत्रांमध्ये सहभागी होतात. जत्रांसाठी सासरी गेलेल्या मुली खास माहेरी आणल्या जातात. नेहमी शेतात राबणा-या कष्टक-यांना जत्रेच्या निमित्ताने विरंगुळा मिळतो. आपापल्या परीने नवनवीन खरेदी केली जाते. देवाला नवस-सायास केले जातात. जुने नवस फेडले जातात. प्रसाद, जेवणावळी सुरु असतात. मोठ्यांबरोबरच बच्चेकंपनींची धूम असते.

जत्रा-यात्रांबरोबरच ग्रामीण भागात विविध सण समारंभ आपापल्या कुवतीनुसार मोठ्या आनंदात साजरे केले जातात. वटपौर्णिमा, नागपंचमी, रक्षाबंधन, गणेशोत्सव, गौरी, मंगळागौर, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांती, पोळा, होळी, गुढीपाडवा आदि सणांना गावांत चैतन्य असते. खासकरुन महिलांमध्ये सणाचे भारी औत्सुक्य असते. नागपंचमी, मंगळागौर, दिवाळी सारख्या सणांना सासुरवासिणींना माहेरी आणले जाते. गोडधोड खायला केले जाते. एरव्ही चटणी भाकरी खाणारे कष्टकरी सणांच्या निमित्ताने आपापल्या कुवतीनुसार गोडधोड करतात. माहेरी आलेल्या मुलींच्या मैत्रिणीची मैफल रंगते. जुन्या आठवणींना उजाळा दिला जातो.

खेड्यातील माणसे वरुन ओबडधोबड, राकट दिसत असली तरी आतून ती प्रेमळ असतात. दारावर आलेल्या पांथिकाला जेऊन जा म्हणणारी संस्कृती फक्त खेड्यांतच पहायला मिळते.

भारतातील ग्रामीण संस्कृती ही खरोखरच महान आहे. परंतु अलीकडे जागतिकीकरण, यांत्रिकीकरणामुळे ही संस्कृती, लघु उद्योग संपुष्टात आले. त्यामुळे या लोकांवर बेरोजगारीची कु-हाड कोसळली. रोजगाराच्या शोधात खेड्यांतील माणसे शहरांकडे स्थलांतरीत होत आहेत. परिणामी खेडी भकास तर शहरे बकाल होत आहेत. शेतक-यांची अवस्था दयनीय बनली आहे. लोकांच्या शहराकडील स्थलांतरामुळे शेतात शेतमजूर मिळेनासे झालेत. निसर्गाची अवकृपा, शासनाची धोरणे, वाढता खर्च, अल्प उत्पन्न यामुळे शेतीचा व्यवसाय आतबट्ट्याचा झाला आहे. मनोरंजनाची नवनवीन साधने, टी.व्ही. चित्रपट, इंटरनेट इ.मुळे रंजनाची पारंपारिक साधने, लोकगीते, प्राचीन वाद्ये, लोककला, खेळ, संस्कृती लोप पावत आहे.

काळाच्या ओघात अमुलाग्र परिवर्तन होत आहे. हे परिवर्तन अपरिहार्य आहे. या बदलांच्या कचाट्यात परंपरेने चालत आलेल्या अनिष्ट बाबी जशा नष्ट होत आहेत. तशाच संस्कृतीतील चांगल्या बाबीही लयास जात आहेत. आता दिसतात ते फक्त ग्रामीण संस्कृतीचे अवशेष.

■



# ग्रामीण भागातील समस्या व उपाय योजना

- रुपाली संतोषराव पाटील

ग्रामीण भाग हा समस्यांनी ग्रासलेला आहे. ग्रामीण भागात मुख्यत्वे करुन अन्न, वस्त्र,निवारा, रस्ते, आरोग्य, पाणी, वीज, शिक्षण इत्यादी समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.

**१) अन्न, वस्त्र व निवारा -**

ग्रामीण भागात व्यक्तींना आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. ग्रामीण भागात व्यक्ती हा रोजागारासाठी शेती, दूग्धव्यवसाय इत्यादी सर्व कामे करतो, परंतु त्याला त्याचा योग्य तो मोबदला मिळत नाही. त्यामुळे आपल्या मुलभूत गरजाही पूर्ण करु शकत नाही. निकृष्ट अन्न, फाटकी वस्त्रे घालून झोपड्यांमध्ये त्याला रहावे लागते.

**२) रस्ते -**

ग्रामीण भागातील रस्ते फारच खराब आहेत. त्यामुळे गावामध्ये दळण-वळणाची साधने येत नाहीत. अशा परिस्थितीत त्यांचे जीवन विस्कळीत होऊन त्याचा फरक त्यांच्या शेतमाल इत्यादीवर पडतो. खेड्यासाठी निधी भरपूर येतो पण कुठे जातो हे कळत नाही.

**३) पाणी -**

'पाणी म्हणजे जीवन' पण महिलांना दूर नदीवरुन पिण्यासाठी पाणी आणावे लागते. त्यामुळे महिलांचे फारच हाल होतात. त्याचबरोबर शेतीला आवश्यक पाणीही उपलब्ध होऊ शकत नसल्याने त्याचा परिणाम उत्पन्नावर होतो.

**४) वीज -**

ग्रामीण भागात सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे वीजेची होय. भारनियमामुळे वीज नसल्यामुळे शेताला विहीर,बोअर इत्यादीचे पाणी भेटत नाही. त्यामुळे पिकांचे नुकसान होते. ग्रामीण भागात वीज ही अठरा ते वीस तास जात असते. ग्रामीण भागातील विजेमुळे जनजीवन विस्कळीत होते.

**५) आरोग्य -**

ग्रामीण भागात आरोग्याविषयी अनास्था दिसून येते. गावात अजूनही शौचालये बांधल्या जात नाहीत. त्यामुळे गावामध्ये रोगराई पसरते व त्याचा परिणाम मानवी जीवनावर पडतो. असे असून देखील ग्रामीण भागातील लोक यासाठी विशेष असे प्रयत्न करताना दिसत नाहीत. गावात दवाखाना असला तरी तेथे मोजक्याच रोगांवर प्राथमिक स्वरुपात उपचार भेटू शकतात. काही ठिकाणी तर हे दवाखाने देखील नसतात. अशा वेळी ग्रामीण भागातील लोकांना शहराकडे धाव घ्यावी लागते. काही वेळा दवाखान्यात पोंहचण्याआधीच रुग्णाला मृत्युलाही सामोरे जावे लागते.

**६) शिक्षण -**

ग्रामीण भागात काही ठिकाणचे अपवाद वगळता शिक्षणाची सोय फक्त प्राथमिक शिक्षणापर्यंत दिसून येते. यातही ग्रामीण भागातील लोक शिक्षणाविषयी अनास्था दाखवितात. त्यामुळे स्वतःबरोबरच आपल्या मुलांनाही ते साक्षर व सुसंस्कृत बनण्यापासून वंचित ठेवताना दिसून येतात. शिक्षण सर्व समस्यांचे निराकरण आहे हे त्यांनी जाणून घेण्याची गरज आहे.

**ग्रामीण भागातील समस्यांवर उपाय योजना -**

१) अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण होण्याकरिता व्यक्तिला त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे.

२) ग्रामीण भागात रस्ते बांधणी व दुरुस्ती झाली पाहिजे. त्यात भ्रष्टाचार होऊ नये.

३) विहीर पुनर्भरण, शेततळे, बंधारे इ. केले पाहिजेत.

४) ग्रामीण भागातील भारनियमन कमी केले पाहिजे. पर्यायी ऊर्जास्तोत्रांचा वापर व्हावा.

५) 'हागणदारी मुक्त गाव', 'गाडगेबाबा स्वच्छता अभियान', इत्यादी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. गावात रुग्णालये सुरु करावीत.

६) ग्रामीण भागात दहावी पर्यंत शाळा सुरु करावी व शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे. ग्रामीण भागात रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण या सर्व समस्या आहेत आणि त्या कमी करण्यासाठी सामुहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

७) घरोघर शौचालये बांधून त्यांचा नियमित वापर व्हावा यासाठी जनजागरण गरजेचे आहे.

८) खेड्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात.

■



# ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्था

- राम हनुमान बुधवंत

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही". असे उद्‌गार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले होते. पण हे वाघिणीचे दूध खेड्यातील मुलांपर्यंत पोंहचलेच नाही तर ती काय गुरगुरणार ?

शहरी भागात जन्मणारी मुले व मुली आपल्या शैक्षणिक जीवनात जास्त प्रमाणात यशस्वी असतात. पण ग्रामीण भागातील विद्यार्थी त्यांच्या तुलनेत मागेच असतात. शहरी भागातील विद्यार्थी जन्मतो तेव्हा त्याला आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांलासुद्धा सारखीच अवयव असतात. मग ही तफावत का ? यांचा उलगडा होण्यासाठी एक उदाहरण आहे. एका कुंडीत एक झाड लावले आणि दुस-या कुंडीत आणखी एक झाड लावले. पहिल्या कुंडीतील झाडाला वेळेवर पुरेसा सूर्यप्रकाश मिळाला, पुरेसे पाणी मिळाले, खत मिळाले आणि दुस-या कुंडीतील झाडाला वेळेवर खत,पाणी व पुरेसा सूर्यप्रकाशही मिळाला नाही तर कोणत्या कुंडीतील झाडाची वाढ चांगली होणार ? पहिल्या कुंडीतील झाड हे दुस-या कुंडीतील झाडापेक्षा मोठे, टवटवीत असेल, अगदी त्याचप्रमाणे शहरी भागातील विद्यार्थ्यांना वेळेवर मार्गदर्शन मिळते, सर्व सोईसुविधा जागेवरच उपलब्ध असतात, त्यामुळे शहरी भागातील विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावतात.

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असतो. लहान मुलांना सांभाळण्यासाठी घरात कोणी नसल्यामुळे त्याचे आई-वडील त्याला आपल्याबरोबरच शेतावर घेऊन जातात. हळूहळू त्याला शेताची एवढी गोडी लागते की, जेव्हा त्याच्या वयाची सहा वर्ष पूर्ण होतात आणि तो शाळेत जाण्यास पात्र होतो, तेव्हा त्याला शाळेपेक्षा शेतच जास्त आवडते. आई-वडील त्याला शाळेत घालतात पण त्याचे मन मात्र शेताकडे ओढ घेत असते. आई-वडील शेतावर गेल्यावर तो मुलगा नंतर शाळेच्या मध्यंतराच्या सुट्टीत शाळा सुटल्यानंतर पुन्हा शाळेत न जाता शेतावर जातो. आई-वडिलांनी जास्तच विरोध केला तर आई-वडील शेतात गेल्यानंतर कोठेतरी गावाच्या मंदिरात लपून छपून आपल्या मित्रांसोबत राहतो पण शाळा मात्र करीत नाही.

काही ठिकाणी शाळेचे वर्ग सात ते आठ असतात. पण त्या ठिकाणी शिक्षक असतात पाच किंवा सहा मग अशावेळी शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्षभर तास व्यवस्थित होणार नाहीत.

पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकविला जात नाही म्हणून वर्षाच्या शेवटी अभ्यासक्रम नेहमी अपूर्ण राहतो. अभ्यासक्रम पूर्ण शिकविलाच नसल्यामुळे विद्यार्थ्यांना नापास होण्याची भीती जास्त असते. या भीतीपोटी विद्यार्थी जो मार्ग अवलंबू नये तो मार्ग अवलंबितो. परीक्षेत उत्तरपत्रिका लिहीत असताना उत्तरे पाहून लिहितात. त्यामुळे हळूहळू 'कॉपी' हा प्रकार वाढू लागतो. अभ्यासक्रम आपल्याकडून पूर्ण झाला नाही म्हणून शिक्षकसुद्धा विद्यार्थ्यांना या प्रकारापासून दूर ठेवत नाहीत. या प्रकारामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा ढासळत आहे. या प्रकाराला मुलेसुद्धा विरोध करीत नाहीत आणि मुलांच्या आई-वडिलांना यातील काही कळत नसते. शिवाय आपल्या कामातून मुलाच्या शिक्षणाकडे पाहण्यास त्यांना वेळ नसतो.

शाळेमध्ये मुलांची उपस्थिती वाढावी यासाठी मुलांना दर महिन्याला किंवा दर तीन महिन्यांनी तांदूळ वाटपाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला होता पण मुलांना देण्यासाठी येणारा तांदूळ शिक्षण अधिकारी, मुख्याध्यापक इ. एकमेकांच्या संगनमताने अर्धा तांदूळ बाजारात नेऊन विकत असत. यावर उपाय म्हणून शासनाने मुलांनाच दररोज दुपारच्या सुट्टीत शाळेतच खिचडी बनवून खाऊ घालणे ही योजना सुरु केली पण शाळेतील खिचडी खाण्याचा अनुभव घेतल्यानंतर ती किती प्रमाणात पोषक आहे हे समजणे कठीणच ?

शाळेमध्ये मुलभूत सुविधा नसतात. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शक्य ती काळजी घेतली जात नाही. शाळेत मुलांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी नसते. अस्वच्छ पाणी पिल्याने मुले आजारी पडण्याची शक्यता असते. शाळेत मोठ्या प्रमाणात डास असतात. त्यामुळेही रोग होणे व त्याचे संक्रमण होण्याची जास्त शक्यता असते. शाळेमध्ये मुलांसाठी बाथरुमची सोय नसते. असली तरी त्याची स्वच्छता राखली जात नाही. घाणेरडा वास येतो. काही शाळेमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाकेही व्यवस्थित नसतात. काही ठिकाणी खोल्या कमी तर वर्ग जास्त, अशावेळी विद्यार्थ्यांना बाहेर मैदानात शिकवितात.

कॉपी करुन दहावी व बारावी पास झाल्यावर जेव्हा या स्पर्धेच्या युगामध्ये तो टिकाव धरु शकत नाही. त्याच्याकडे योग्य ज्ञान नसते आणि आज ज्याच्याकडे ज्ञान, कौशल्य आहे त्याचीच किंमत या जगात आहे. चांगल्या मार्गाने तो विद्यार्थी एखादी चांगली नोकरीसुद्धा मिळवू शकत नाही, परिणामी आपल्या शैक्षणिक कारकीर्दीत पूर्णपणे अपयश आल्यामुळे तो विद्यार्थी शिक्षणाकडे निराशेने पाहतो. शिक्षण हे कच-यासारखे वाटू लागते. त्याच्यापुढे पुन्हा बेरोजगारीची समस्या उभी राहते. कुठेतरी तो विद्यार्थी हतबल होतो आणि आत्महत्या करण्याचाही विचार करतो.

ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा ढासळण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार एखादा राजकीय नेता आपल्या पैशाच्या जोरावर खाजगी शिक्षणसंस्था उघडतो आणि त्या शाळेवर शिक्षक या पदासाठी येणा-या व्यक्तीकडून दहा-बारा लाख रुपये वसुल करतो. ज्याच्याकडे ज्ञान असेल तो पैसा देत नाही व नोकरीही नको म्हणतो, मग अशा ठिकाणी कमी कौशल्य असणारे अपात्र शिक्षक निडवल्या जातात. जर शिक्षकालाच काही येत नसेल तर ते विद्यार्थ्यांना काय शिकविणार ? त्यामुळे खेड्यांमधून उघडली जाणारी शिक्षणसंस्थांची दुकाने व त्यांत चालणारा भ्रष्टाचार, वशिलेबाजी, डोनेशन यांवर शासनाने नियंत्रण आणले पाहिजे. परंतु संस्था या राजकारण्यांच्याच तेव्हा त्यांच्याकडून हे काम कितपत पूर्ण होईल याची शंकाच आहे.

■



# ग्रामीण जीवन

- शेख समीना अब्दुल रौफ

भारताला स्वातंत्र्य मिळून आज साठ वर्षे पूर्ण होऊन गेली असली तरी ज्या अनेक खेडी मिळून एक विशाल भारत बनलेला आहे त्या भारतातील खेड्यांची अवस्था अद्यापही हलाखीची दिसून येते. अनेक समस्यांनी भरलेलं ग्रामीण जीवन बघताना असे वाटते की, स्वातंत्र्य अद्याप आपणाला मिळालेच नाही. महात्मा गांधींनी आदर्श ग्रामाची संकल्पना मांडली होती. परंतु ती आज आहे काय?

अलीकडे शासनाने पंचायतराजच्या माध्यमातून आदर्श ग्रामांना पुरस्कृत करण्याची योजना राबविली आहे. त्याकरिता निष्णात अशा प्रकल्पकारांनी आदर्श खेडी कशी असावी ? याबद्दलचे नियोजन केले. एका समारंभात हा प्रकल्प पाहण्याकरिता खेड्यातील प्रमुख लोकांना आमंत्रित केले. हा प्रकल्प पाहिल्यानंतर असे वाटायला लागले की, खरेच भारतातील सर्व खेडी अशी असतील का ?

ग्रामीण जीवन म्हणजे शहरापासून ब-याच अंतरावर असलेल्या वस्त्या, ज्यांचा शहराच्या वातावरणाशी काहीच संबंध नाही. शहरात मिळणा-या सुविधांपासून खेड्यात राहणारा सामान्य नागरिक वंचित आहे. फार लांबून पिण्याचे पाणी आणावे लागते. गावामध्ये एखादी विहीर अथवा जवळपास एखादी नदीसुद्धा नसते. खेड्यातील महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. एवढे करुनसुद्धा आरोग्यास अपायकारक असणारे पाणी अपरिहार्यपणे प्यावे लागते. अशी अनेक गावे भारतात बघायला मिळतात. आरोग्याच्या सोयींचा अभाव, तज्ञ डॉक्टरांचा अभाव, औषधांचा अभाव हा तर या ग्रामीण माणसाच्या पाचवीलाच पुजला आहे. पाच-दहा खेडी मिळून एक दवाखाना असतो. तिथे डॉक्टर वेळेवर उपस्थित नसतात. या ग्रामीण लोकांच्या नित्याच्या तक्रारी असतात. सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा खेड्यामध्ये अद्याप पोंहचली नसल्यामुळे ते

रस्त्यावरुन वाहत असते. त्यामुळे रोगराईचा प्रादुर्भाव उद्‌भवतो. एखाद्या रुग्णाची स्थिती गंभीर बनल्यास वाहतुकीच्या साधनांच्या अभावामुळे त्याला शहरात चांगल्या इस्पितळात पोंहचवू शकत नसल्यामुळे शेवटी त्याला मृत्युला कवटाळणे अपरिहार्य ठरते. वाहतुकीच्या साधनांचा अभाव हा सुद्धा ग्रामीण समाजापुढील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. गाव तेथे एस.टी. ही महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन मंडळाद्वारे केलेली घोषणा अद्याप खेड्यापर्यंत पोंहचली नाही. त्यामुळे वाहतुकीच्या साधनांचा अभाव खेड्यापाड्यातून ठळकपणे जाणवतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना अवैध वाहतुक करणा-या जीप अथवा टेम्पोमधून प्रवास करावा लागतो. वेळ पडल्यास आपल्या प्राणालाही मुकावे लागते.

अनेक ग्रामीण भागात आजही निरक्षरता आढळून येते. त्याचे मुख्य कारण म्हणजे तेथे शिक्षणाच्या पुरेशा सोयी नसणे. दहा-दहा किलोमीटर दूर अंतरावर शाळा असल्यामुळे पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठविण्यास घाबरतात. अनेक आदिवासी वस्त्यांमध्ये स्थिती दयनीय आहे. देशाची एकविसाव्या शतकाकडे वाटचाल चालू असतांना, विज्ञानयुगात व संगणक युगात आजही भारतात कितीतरी खेड्यांमध्ये वीज पोंहचलेली नाही. रॉकेलचे दिवे तेथील ग्रामस्थांना अंधारात साथ देतात. मेळघाटसारख्या दुर्गम ठिकाणी कितीतरी बालके कुपोषणामुळे दगावली आहेत.

भारतात सरकारने वीस कलमी कार्यक्रमाचे धोरण जाहीर केले. आणि या कार्यक्रमामध्ये खेड्याच्या विकासाला प्रथम महत्त्व दिले. परंतु केवळ पूर्णतः सरकारवर विसंबून न राहता समाजातील अनेक सेवाभावी संस्थांनी अशा दुर्गम भागापर्यंत पोंहचून तेथील समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करावा. तसेच सुशिक्षित वर्गातील प्रत्येक व्यक्तीने, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अशा खेड्यात जाऊन तेथील नागरिकांना स्वच्छतेच्या, आरोग्याच्या सवयी लावून त्याचे महत्त्व पटवून द्यावे. श्रमदानाद्वारे गावातील रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था सांगावी. निरक्षर लोकांना साक्षर करण्यासाठी मोहिम हाती घ्यावी. ग्रामस्थांच्या जीवनाकडेच नव्हे तर त्यांच्या जीवनतील दुःखांकडे, त्यांना आवश्यक असलेल्या सुविधांकडे, त्यांच्या समस्यांकडे बंधुभावाच्या भावनेतून बघावे. तरच ग्रामीण जीवनात जलदगतीने प्रगती होऊन ग्रामीण भागातील जीवन आनंदी होईल.

■

## ग्रामीण जीवन :
## तरुणाईची घुसमट

- रुबिना शेख खाजामियाँ



भारत हा खेड्यांचा देश आहे. येथे जवळपास ६ लाखांपेक्षा जास्त खेडी आहेत. बहुतांशी जनता खेड्यातच राहते. या ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय शेती. या शेतीतून जे तुटपुंजे उत्पन्न येईल त्यावर कसा-बसा उदरनिर्वाह करायचा. खर तर आजही या ग्रामीण जीवनाला विकासाला गंध लागला नाही, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. खेड्यातील लोकांच्या सर्व समस्यांचे मुळ कारण म्हणजे त्यांच्या विचारातील मागासलेपणा. कित्येक कवींनी, लेखकांनी ग्रामीण जीवनाबद्दल लिहिले आहे. खरे तर सत्याचा लवलेशही नसताना केवळ कल्पनाविश्वात रमून गेलेल्या रचनाच मोठ्या प्रमाणावर असतात. ग्रामीण जीवन ज्यांनी अनुभवलं तेच ख-या अर्थाने समजू शकतात काय असतं इथलं सत्य, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा ? काय असतो ग्रामीण जीवनातील घुसमटलेपणा.

प्रसिद्ध ॲथलेटिक्स कविता राऊत म्हणते की, मी ग्रामीण भागात जन्मले हे माझं नशीबच. कारण शहरी भागात, सुशिक्षित समाजात स्त्रीभ्रूणहत्त्याचे प्रमाण जास्त आहे. कदाचित जन्मण्याअगोदर इथं अस्तित्व नष्ट होतं. मात्र माझ्या मते फार दुर्भाग्यवान असतात

त्या मुली ज्यांचा जन्म खेड्यात किंवा लहान गावात होतो. जन्मापासून मृत्युपर्यंत समस्यांचा सामना करावा लागतो. शहरात मुलींचं प्रमाण कमी. मात्र आहे तेवढ्या किमान ताठ मानाने तर जगतात. मनासारखी स्वप्न पाहण्याचं, हे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी लढण्याचं, स्वप्नपूर्तीतून आकाशभरारी घेण्याचं स्वातंत्र्य तर त्यांना मिळतं. खेड्यातल्या मुलींना तर घरात दुय्यम दर्जा असतोच पण बाहेर निघाव तर समाजाची हजार बंधनं. एकट्या मुलीने कोठे जाऊ नये, मोठ्यानं बोलू नये. घरातली कामं तेवढी करावी, शिकून करायचं काय ? संसारच सांभाळायचा मग काय करायचं शिक्षण ? आणि एखादी शिकलीच तर 'डोक्यावर मिरे वाटणारी' हे विशेषण चिटकलच तिला. चुकून एखादी मुलगी मुलाला बोलली तर गावभर चर्चा सुरु होते. मस्त चघळायला विषय भेटतो. विचारांच्या या कुंठीत दुनियेत नवीन पिढी जगणार कशी ? मुलांच्या बाबतीतही तेच कमी वयात जबाबदारीच ओझं. नशिबानेच एखाद्याला स्वातंत्र्य, शिक्षण भेटतं. अपवादात्मक परिस्थितीतून हजारातून एखादा पुढे जातो. पण....बाकीच्याचं काय?

शासकीय नोक-यांमध्ये तेहतीस टक्के आरक्षण, पंचायतीत पन्नास टक्के आरक्षण हे सगळं स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी. शहरातील महिला येत आहेतसुद्धा, खेड्यातील स्त्रियांचं काय? नावाला स्त्रिया मात्र खरी सत्ता पुरुषांच्याच हाती. ग्रामीण महिला नोकरीमध्ये तर नाही राजकारणातही केवळ नावापुरत्या. खरे उपभोगी पुरुषच असतात. खरच हे ग्रामीण जीवन म्हणजे, ग्रामीण तरुणाईला मिळालेला शापच आहे. कारण इथले बुरसटलेले विचार कधीही संपणार नाहीत. या विचारांच्या गर्तेत डोळ्यात हजारो स्वप्ने असतानासुद्धा तरुण वर्गाला एका जागीच घुसमटावे लागते. विशेषतः ग्रामीण स्त्रिया आणि मुली यात होरपळून निघतात. या बदलासाठी वाट पाहण्याशिवाय पर्याय नाही. कारण परिस्थिती बदलण्यासाठी विचारपरिवर्तन आवश्यक आहे, आणि या परिवर्तनासाठी कित्येक दशकं ओलांडली जाणार कारण विचार परिवर्तन ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे.

■



# ग्रामीण भागाचे बदलते रुप

- रेणुका गोपाळराव दीक्षित

ब-याच वर्षापासून आपण पाहत आलो आहोत की, ग्रामीण भागात क्लेशदायक अशा रुढी, परंपरा अस्तित्वात होत्या. कुठल्याही प्रकारच्या शिक्षणाच्या संधी नव्हत्या, विशिष्ट करुन स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते. पण आज ती परिस्थिती राहिली नाही. आज बरेच बदल झाले आहेत. पूर्वी प्राथमिक शिक्षणसुद्धा घेता येत नसे, पण आता माध्यमिकच नव्हे तर उच्च माध्यमिक, पदवी व त्यापुढेही शिक्षण सर्वांना मिळत आहे. माझ्यामते ही बाब अतिशय आनंदाची आहे.

फक्त याच बाबतीत बदल झाला असे नाही तर विशेष करुन स्त्रियांच्या हितासाठी बरेच चांगले बदल ग्रामीण भागात झाले आहेत. दुर्देवाने ते सर्वत्रच झाले असे नाही. मला वाटते हे बदल सर्वत्रच झाले पाहिजेत. कारण जन्म देणारा तो इश्वर स्त्री व पुरुषाला समान बुध्दी प्रदान करतो. निसर्ग सर्वांनाच समान पद्धतीने वागवतो. मग माणसानेच भेदभाव का करावा ? चुल आणि मुल एवढेच काम स्त्रिला का द्यावे ? का तिला तिच्या बुध्दीला चालना द्यायला संधी व वेळ देऊ नये ? ती तर द्यायलाच हवी.

आज आपण पाहतो की, मुलीचे लग्न हे योग्य वयात करतात. आणि त्या मुली लग्नानंतरसुद्धा शिक्षण घेतानाचे चित्र दिसून येते. तसेच या मुली ब-याच चांगल्या क्षेत्रात कामही करीत आहेत. पहिल्यापेक्षा आता ग्रामीण भागातील मुलींच्या बोलण्यात, विचारात राहणीमानात चांगले बदल घडून आले आहेत. ते केवळ शिक्षणामुळेच.

आज ग्रामीण भागातील राहणीमानही व्यवस्थित झाले आहे. बरीच खेडी ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छ व निर्मळ झाल्याची दिसून येतात. या भागातील मुलेही उच्च शिक्षणासाठी बाहेरच्या ठिकाणी जातात व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत आहेत. उच्च पदे व नोक-या प्राप्त करीत आहेत. अशाप्रकारे हे बदल सर्वच ठिकाणी झाले तर चांगले होईल.

आज ग्रामीण भागात नवनवीन तंत्रज्ञान पहावयास मिळते. त्यामध्ये संगणकाचाही समावेश आहे. आजचा सुजान शेतकरी इंटरनेटच्या माध्यमातून वातावरणातील बदल जाणून घेतो व त्या बदलाप्रमाणे आपल्या शेतीतही बदल करुन चांगले उत्पन्न मिळवित आहे. एवढेच नव्हे तर आपला शेतीतील माल राज्यात, परराज्यात इतकेच नव्हे तर परदेशातही पोंहचवित आहे. परंतु अशी परिस्थिती व सुजान शेतक-यांची संख्या भारतात त्यातल्या त्यात मराठवाड्यात तर फारच अत्यल्प आहे.

आज ग्रामीण भागातील स्त्रीही पुरुषांच्या बरोबरीने असल्याचे चित्र दिसून येत आहे. ती शेतातच नव्हे तर स्वयंरोजगाराच्या माध्यमातूनही आपल्या कुटुंबाची आर्थिक मदत करीत आहे. यामध्ये मग नैसर्गिक खत, बचत गट, वेगवेगळ्या फळांचे रस तयार करणे अशा विविध उपक्रमातून ती कुटुंबास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे महिलांना राजकीय क्षेत्रामध्ये ५० टक्के आरक्षण मिळाल्यापासून अनेक खेड्यामध्ये महिलाराज असल्याचे चित्र निर्माण होत आहे. घर चालविणा-या देश का चालवू शकत नाही ? अशाप्रकारच्या भावनेने प्रेरित होऊन त्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदवित आहेत.

आज खेडी जगाशी जोडली जात आहेत. पूर्वी जेथे एखादा रेडिओ नसायचा तेथे आज टी.व्ही., संगणक, इंटरनेट, मोबाईल इ. सुविधा पोंहचल्या आहेत. खेडी पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत पक्क्या व सुंदर रस्त्यांनी जोडली जात आहेत. शहरांशी दळण-वळण, व्यापार संपर्क वाढत आहे. खेड्यांच्या विकासासाठी हे चित्र आशादायक आहे. एकूणच आज खेडी सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक इ. मध्ये अंर्तबाह्य बदलत आहेत.

■



## ग्रामीण भागातील समस्या

- श्रीकांत गंगाधरराव जाधव

सन २०२० साली भारत 'महासत्ता' होणार असे माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे स्वप्न आहे. मानवाने प्रगतीची उंच भरारीच घेतली आहे. भारताने विविध उपग्रह अवकाशात सोडले आहेत. पण आजही भारतातील खेडी अविकसितच आहेत. खेड्यांमध्ये आजसुद्धा पायाभूत सुविधा नाहीत. पिण्याचे पाणी, प्राथमिक आरोग्य, वीज, शिक्षण यांसारख्या अनेक समस्या खेड्यात आहेत. खेड्यात पायाभूत सुविधा नसल्यामुळेच शिक्षित वर्ग खेड्यात राहण्यास, वास्तव्य करण्यास सहजासहजी तयार होत नाहीत, ही आजची परिस्थिती आहे.

आज शहरी भागाचा ज्या गतीने विकास होत आहे त्याच गतीने जर भारतातील खेड्यांचा विकास झाला तरच २०२० साली भारत महासत्ता बनेल. भारतातील ६५ टक्के लोक खेड्यात राहतात आणि जर केवळ ३५ टक्के लोक सुधारले पण संपूर्ण देश मात्र सुधारत नाही. याची जाणीव ठेऊन संपूर्ण भारताचा विकास घडविण्यासाठी आज खेड्यातील समस्या सोडवून

पायाभूत सोयी पुरविण्याची गरज आहे.

**१) आरोग्य -**

'आरोग्य हीच संपत्ती' ही उक्ती आपण सर्वजण शाळेच्या व रुग्णालयाच्या भिंतीवर वाचतो. माणसाचे आरोग्य चांगले असेल तर माणूस कोणत्याही परिस्थितीवर मात करु शकतो. ग्रामीण भागात आरोग्याची समस्या सर्वात महत्त्वाची समस्या आहे. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र तर आहेत पण त्या भागातील कार्यरत डॉक्टर संबंधित गावात न राहता कोठेतरी तालुका, जिल्हा अशा ठिकाणी राहतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असणा-या सुविधासुद्धा नसतात. डॉक्टर वेळेवर हजर नसतात. रुग्णालयात आवश्यक असणारे इंजेक्शन्स, सलाईस, औषधे, गोळ्या यांचा तुटवडा नेहमी असतो. रुग्णाला लागणा-या औषधांपैकी अर्धी औषधे बाहेरुन विकत आणावी लागतात.

एखाद्या व्यक्तीला जर साप चावला तर केवळ योग्य उपचारांअभावी २० टक्के रुग्ण मृत्युमुखी पावतात. साप चावल्यानंतर त्या रुग्णाला दवाखान्यात दाखल करण्यासाठी खूप वेळ लागतो. रुग्णालयात पोंहचण्याआधीच तो मृत्युमुखी पावतो.

प्रसुतीच्यावेळी जर काही अडचण आली तर अशावेळी त्या स्त्रिला प्रवास सहन करावा लागतो. योग्य उपचार न झाल्यामुळे बाळ गर्भातच गुदमरुन मृत्यू पावते.

**२) वीज -**

ग्रामीण भागातील लोकांचा महत्त्वाचा व्यवसाय शेती हा आहे. शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेतीपेक्षा कमी महत्त्वाचा असणारा उद्योग व कारखानदारी हा व्यवसाय. त्यामध्ये शेतीला जास्तीत जास्त १० तास वीजपुरवठा केला जातो तर कारखाने व इतर उद्योगांसाठी २० तासापेक्षा अधिक विद्युत पुरवठा केल्या जातो. हा कोणता न्याय आहे ? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

शहरी भागात कारखाने चालविण्यासाठी २४ तास वीजेची मुभा असते पण ग्रामीण भागातील लोकांना रात्रीचा अंधकार दूर करुन शांत झोप घेण्याइतकीही वीज उपलब्ध नसते. रात्रीच्या अंधकारात लोकांना बाहेर पडणेही मुश्किल होते. कारण ग्रामीण भागाच्या रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते हेच कळत नाही.

ग्रामीण भागात सौर ऊर्जेचा वापर अपेक्षित प्रमाणात होत नाही. सौर ऊर्जेविषयी लोकांना माहिती नाही. ग्रामीण भागात पवनऊर्जेचा प्रकल्पसुध्दा नसतो. पवनऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी लागणारा खर्च जास्त असतो. महावितरण कंपनी सन २०१२ पर्यंत प्रत्येक गावात वीज पोंहचविणार व सन २०१५ पर्यंत प्रत्येक घरात वीज पोंहचविणार असे नारे लावत आहे.

**३) शिक्षण -**

ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धा दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण भागातील लोकांची निरक्षरता,, अज्ञान इत्यादी. या भागातील शाळांमध्ये मुलभूत सोई नसतात. मुलांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी, बाथरुमची सुविधा नसते. त्यांना आजही जमिनीवर बसावे लागते.

**४) पाणी -**

'जल हेच जीवन' अशी एक संकल्पना आहे. पण ग्रामीण भागासाठी ही उक्ती उपयुक्त पडत नाही. कारण ग्रामीण भागात मिळणारे पाणी स्वच्छ असेलच याची खात्री नाही. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यामध्ये ब्लिचिंग पाऊडर, तुरटी इत्यादी घटकांचा वापर करुन ते स्वच्छ न करता जशास तसे पाणी पुरविले जाते.

सार्वजनिक पाणवठ्याच्या ठिकाणी गटार तसेच केरकचरा इत्यादि गोष्टी असतात. गटारीतील पाणी

या पाणवठ्याच्या शेजारीच डोहाच्या रुपाने साचत राहते व तेच पाणी जमिनीमध्ये मुरुन ते विहीर, बोर इत्यादीच्या जलस्रोतामध्ये मिश्रित होऊन प्रदूषित होऊन प्राप्त होते.

काही खेड्यात उन्हाळ्यात तर पाणी एक-दोन किलोमीटर अंतरावरुन आणावे लागते. पाणी पुरवठा करण्याच्या नावाखाली गावात नुसतेच प्रकल्प उभे केलेले आहेत पण दररोज लोकांना पाणी काही भेटत नाही.

**५) बेरोजगारी -**

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. पण भारतीय शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे भरपूर उत्पन्न मिळत नाही. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यानंतर चांगले उत्पन्न मिळू शकते, पण प्रत्येक शेतक-याला आपल्या शेतात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य नसते.

ग्रामीण भागात पूर्वी एका शेतक-याला २० ते २५ एकर शेती होती. पण आता त्याचे विभाजन होऊन ती ४ ते ५ इतकी सिमीत झाली आहे. जेव्हा २० ते २५ एकर शेती होती तेव्हा तो आपल्या कुटुंबाचे उदरभरण व्यवस्थित करु शकत होता. पण आता कमी शेतीमुळे तो तेही व्यवस्थित करु शकत नाही.

ग्रामीण भागात कारखाने, कंपन्या नसतात. त्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागात 'सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजने' अंतर्गत गावातील  व्यक्तींना नोंदणी झाल्यानंतर गावापासून तीन किलोमीटरच्या आत व पंधरा दिवसाच्या आत कामाची हमी देण्यात येते. १०० दिवसाचे काम दिल्या जाते आणि दामसुद्धा दिल्या जाते. परंतु १०० दिवसांच्या कामानंतर उरलेल्या २६५ दिवसामध्ये तो बेरोजगारच असतो. हा एक चिंतनाचा मुद्दा आहे.

अशाप्रकारे आज भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असला तरी प्रामुख्याने ग्रामीण भागातील वीज, आरोग्य, पाणी, शिक्षण व बेरोजगारी यांसारख्या असंख्य अडचणी भारतासमोर आहेत. ग्रामीण भागाचा विकास हाच खरा विकास आहे.

स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये ग्रामीण भागातील लोकांना सामावून घेणे, त्यांच्यामध्ये राजकीय जागृती घडविण्यासाठी गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश स्वातंत्र्यपूर्व काळात दिला होता पण तोच संदेश आज खेड्यांचा विकास घडविण्यासाठी आवश्यक आहे.

■



## आधुनिक आदान-प्रदानाचे तंत्रज्ञान

- दीप्ती सुरेश कांबळे

आज आपण आधुनिक युगात वेगवेगळ्या क्षेत्रातील माहिती आदान-प्रदान करण्यासाठी भ्रमणध्वनी या साधनाद्वारे, इंटरनेटवरुन कोणतीही माहिती मिळवू शकतो. तसेच संगणकाच्या सहाय्याने डेटा शेअरींग करुन माहितीचे आदान-प्रदान केले जाते. माहितीचे आदान-प्रदान यामध्ये ब्ल्यूटूथने मोठा वाटा उचलला. या डिव्हाईसमुळे कोणत्याही प्रकारचा खर्च करण्याची गरज नाही व जलद सेवेचा लाभ मिळविता येतो. ब्ल्यूटूथ हे आकाराने अगदी छोटे आणि वायरलेस उपकरण आहे. काही उपकरणांमध्ये हे इनबिल्ट असते.

आकाराने लहान असलेलं आणि पोर्टेबल डिवाईस डेटा ट्रान्सफर्मर असल्यामुळे याला मागणीचे प्रमाण खूप आहे. ब्ल्यूटूथमुळे एका भ्रमणध्वनीतून दुस-या भ्रमणध्वनीमध्ये किंवा एका संगणकामधून दुस-या संगणकामध्ये डेटा पाठविणे-मिळविणे अशा प्रक्रिया करता येतात. यामध्ये वायलेस डिव्हाईस तंत्रज्ञानाचा उपयोग केला असून यामध्ये रेडिओ तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. यामुळे ब-याच अंतरावरील माहिती देण्या-घेण्याचे काम करणे शक्य होते. कमी अंतरात प्रक्रिया खूप चांगल्या प्रकारे वापरता येते. साधारणपणे या तंत्रज्ञानाचा वापर ३० ते ३५ फूट किंवा १० मीटर परिसरात करता येतो. याची क्षमता २.४ GHZ इतकी आहे.

या सुविधेचा लाभ मोठ्या प्रमाणात भ्रमणध्वनीधारक करतात. भ्रमणध्वनीमध्ये ब्ल्यूटूथ तंत्रज्ञान पूर्वजात असते. संगणकावर काम करतांना किंवा इंटरनेट कनेक्ट वेळी दोन्ही प्रकारे वापर करता येतो. सध्याच्या युगात या तंत्रज्ञानाचे ०४.० हे नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. या नव्या शोधामध्ये इंटरनेट उच्च गती वापरुन अत्यंत कमी ऊर्जेचा वापर करुन व्हर्जनमध्ये वापर करता येतो.

या तंत्रज्ञानाचा वापर आधुनिक काळात खालील साधनांद्वारे केला जातो. फॅक्स, भ्रमणध्वनी, लॅपटॉप, प्रिंटर, संगणक, व्हिडिओ गेम, डिजिटल कॅमेरा व टेलिफोन अशा वेगवेगळ्या साधनांद्वारे याचा वापर होत आहे. ब्ल्यूटूथ तंत्रज्ञान विविध नामांकित कंपन्याकडून बनविण्यात येतात. उदा. नोकिया, आय.बी.एम., तोशिबा, रिलायन्स.

याचे जाळे तयार करणा-या कंपन्यामध्ये स्पर्धा होत आहेत. वेगवेगळ्या १५ हजार कंपन्या याचे उत्पादन करुन जाळे पसरवित आहेत. या तंत्रज्ञानामुळे भ्रमणध्वनीतील बॅटरीमधील ऊर्जा पटकन कमी होण्याची दाट शक्यता असते.

आज ग्रामीण भागात जरी संगणक पोंहचले असले तरी इतर आधुनिक तंत्रज्ञान पोहचू शकले नाही. जर हे तंत्रज्ञान ग्रामीण भागातील जनतेला मिळाले तर येथील शेतीबरोबरच ग्रामीण भागही सुधारेल व उद्याचा भारत हा महासत्तेकडे यशस्वीपणे वाटचाल करेल.

■



# ग्रामीण स्त्री

- विद्या एकनाथराव मुंजे

अरे संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर ही बहिणाबाईंची कविता वाचली की डोळ्यांसमोर येते ती ग्रामीण भागातील स्त्री, तिचं जीवन. आजही ग्रामीण भागातील स्त्री चुल आणि मुल याच कार्यक्षेत्रात वावरताना दिसून येते.

आज जरी एकविसावे शतक चालू असले तरी आजही ग्रामीण स्त्रिची परिस्थिती पूर्वी होती तशीच आहे. 'रांधा वाढा उष्टी काढा' याच गराड्यात ती अडकलेली दिसून येते.

ग्रामीण भागातील या परिस्थितीची कारणे खूप आहेत. त्यातील महत्त्वाचे म्हणजे, त्यांची मानसिकता, मग ती स्त्री शिक्षणाची असो, किंवा परंपरेने चालत आलेल्या तिच्या समाजातील स्थानाची. तिला एका चौकटीत बसवलेले आहे. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण तिच्यासाठी अग्निपरीक्षाच. त्यासाठी तिला संपूर्ण समाजाला सामोरे जावे लागते. शिक्षणासाठी बाहेर जाताना समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदललेला असतो. एक नाही अनेक समस्या शिक्षण घेतांना रोज समोर येतात. घरच्यापेक्षा समाजाचा जास्त दबाव असलेला दिसून येतो. तिचे लग्न करताना सुद्धा तिला विचारात घेतले जात नाही. स्वतःच्या आयुष्याचा एवढा मोठा निर्णय घेतानासुद्धा स्वतंत्रपणे विचार ती करु शकत नाही. प्रत्येक गोष्टीमध्ये तिचा कोंडमारा केला जातो. विरोध करुन तरी कुठपर्यंत करणार अन् कुणाकुणाला करणार.

पण याबरोबरच ग्रामीण भागातील स्त्रियांची स्थिती पाहताना खंत वाटते. आजही भारतातील सर्वात मोठा असलेला ग्रामीण भाग सर्व प्रगतीपासून दूर असलेला दिसून येतो. आज देशाचा कारभार जरी एक स्त्री पाहत असली तरी देशाचा आत्मा समजल्या जाणा-या ग्रामीण भागातील स्त्रीची स्थिती खूप दयनीय दिसून येते. ग्रामीण व शहरी या दोन्ही भागातील स्त्रियांची तुलना केल्यास खूप मोठी तफावत दिसून येते.

आजही ग्रामीण भागात स्त्रियांना पुरुषांच्या मानाने दुय्यम स्थान आहे. फक्त कुटुंबापुरतेच तिचे क्षेत्र मर्यादित आहे. एकत्र कुटुंबपद्धती असल्यामुळे तसे स्त्रिला स्वातंत्र्य क्वचितच आढळते. जरी तिने काही बोलण्याचा प्रयत्न केला तरी तिला अतोनात छळाला सामोरे जावे लागते. त्यांच्या समस्या न संपणा-या आहेत. याची सुरुवात तर तिच्या जन्मापासूनच होते. रोज वर्तमानपत्रात अशा कित्येक घटना वाचायला मिळतात. स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाणसुद्धा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील मुलींना तरी काही प्रमाणात स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. परंतु ग्रामीण भागातील मुलींना ना विचार स्वातंत्र्य, ना निर्णय स्वातंत्र्य. लग्ना अगोदर आई-वडील व लग्नानंतर, सासु-सासरे, नवरा यांच्याच विचाराने तिला चालावे लागते. जसे एका पिंज-यातून काढून तिला दुस-या पिंज-यात टाकले जाते. फरक एवढाच की फक्त जागा बदलली, स्थिती नाही.

तिच्या समस्यामधील अजून एक समस्या म्हणजे लग्नात दिला जाणारा हुंडा. कायद्याने जरी तो बंद असेल तरी तो फक्त कागदावरच. ही प्रथा शहरी भागात असली तरी त्यांच्याकडे ती देण्याची क्षमता असते. परंतु ग्रामीण भाग हा शेतकरी वर्गांचा असल्यामुळे ते हुंडा देण्यास असमर्थ असतात. यातून हुंडाबळी मोठ्या प्रमाणात वाढले आहे. रोज कित्येक स्त्रिया याला बळी पडत आहेत. परंतु याची कुणीही गंभीरपणे दखल घेतलेली दिसून येत नाही. जोपर्यंत ही परिस्थिती बदलत नाही. तोपर्यंत आपण पूर्णपणे विकसित म्हणवल्या जाणार नाही. देश विकसनशीलच राहील, कारण भारत हा खेड्यांचा देश म्हणवल्या जातो व खेड्यांचा विकास या सर्व समस्या दूर झाल्यावरच होईल. म्हणून ग्रामीण स्त्रीचा दर्जा सुधारणे, तिला एक माणूस म्हणून वागणुक देणे आवश्यक आहे.

■



# ग्रामीण स्त्री जीवन

- यशोदा रामेश्वर व्हन्डे

भारताला स्वातंत्र्य मिळाले राज्यघटना अंमलात आली. समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय इत्यादी मूल्यांचा स्विकार स्त्रियांच्या दृष्टीने उपकारक ठरला. असे झाले तरी जुन्या रुढी आणि परंपरा इतक्या दृढ होत्या की, स्त्रियांबाबतचा दृष्टीकोन बदलला नाही व ग्रामीण भागातील स्त्रीचा तर कोणत्याच प्रकारे विकास होऊ शकलेला नाही. कारण ती आजही कुटुंबाच्या मर्यादा ओलांडू शकलेली नाही. ती गृहिणी, पत्नी, आई, आजी, सासू अशा अनेक नात्यांना निभावते. कुटुंब, त्याचा परिसर निटनेटकेपणाने सांभाळणे, उणेदुणे पूर्ण करणे. घरातल्या आबालवृद्धांची सेवा सुश्रुषा, त्यांचे शिक्षण, त्यांचे विवाह या सर्व बाबींकडे लक्ष द्यावे लागल्यामुळे तिच्या स्वतःच्या विकासाला वेग येत नाही.

ग्रामीण भागातील भूमीहीन किंवा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या भरपूर आहे. अशा कुटुंबात पुरेसे अन्नही मिळत नाही. हंगामात काम व

खायला ब-यापैकी असते. हंगाम संपल्यावर मात्र ही कुटुंबे बेकार होतात. कधी दुष्काळ असतो. या कुटुंबातील दोन्ही परिस्थितीत अनेक समस्या व संघर्षाला तोंड द्यावे लागते ते फक्त 'स्त्रीलाच'!

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री विकास घडवून आणण्याचा फार मोठा प्रयत्न यशस्वी झाला. परंतु 'खेड्याकडे' चला या गांधीजींच्या संदेशाप्रमाणे खेड्याचा विकास तर झालेलाच नाही. त्याचबरोबर खेड्यातील स्त्रीचा तर नाहीच ! परंतु ग्रामीण भागातील स्त्रियांना अजूनही स्वतंत्र्य, सामाजिक अस्तित्व, स्वावलंबी जीवन जगण्याचा अधिकार नाही. ग्रामीण स्त्रियांचा पूर्णवेळ पाणी, इंधन व रेशनींग या जीवनावश्यक गोष्टींची व्यवस्था लावण्यात जातो. एक ते दोन किलोमीटर अंतरावरुन पाणी आणणे, दोन-चार किलोमीटर अंतरावरुन जंगलातील लाकडे इंधनासाठी आणणे. तसेच घरातील धान्याचे नियोजन लावणे अशा अनेक गोष्टींसाठी संघर्ष करुन आर्थिक टंचाईला स्त्रीलाच सामोरे जावे लागते. अशा समस्या ती समर्थपणे सोडवते. तिलासुद्धा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटावयाचा असतो पण विकास करण्यासाठी तिला संधी फार कमी वेळा मिळते.

'स्त्री' एक माता असून मुलाच्या जन्माच्या, पोषण, वर्धन व विकासाच्या दृष्टीने तिचा आत्मिक, बौद्धिक विकास होणे गरजेचे आहे याची जाणीवच नसते. स्वयंपाकघरात तिला जखडून टाकणे, संसारातील धडपड, दगदग या सर्व गोष्टी रुढींच्या दबावाखाली मान्य करते. अशाने ती कुटुंबात एका सुदृढ व निरोगी बालकास जन्म देऊ शकत नाही, एकूणच काय तर तिला स्वतंत्र असं व्यक्तिमत्त्व नसतेच.

ग्रामीण भागातील स्त्रिया अत्यंत कष्टाळू व व्यवहारचतुर असतात. त्यांना फ्रीज, कूलर, टी.व्ही. वॉशींग मशीन अशा सुखसोयी नसल्यामुळे त्या यांत्रिक न होता प्रतिकूल वातावरणातून परिस्थितीशी झुंजत असतात. तिची सारी चतुरता, कार्यक्षमता आणि विचारशीलता या गुणांचा विकास करण्याकरिता धडपडत राहते. राष्ट्राच्या विकासात पुरुषांबरोबरच स्त्रियांचे योगदानही महत्त्वाचे आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांमध्ये जाणीव जागृती करुन त्यांना आत्मनिर्भर व सशक्त बनविले पाहिजे.

■



# ग्रामीण भागातील अद्‌भूत चमत्कार : लोणार

- नेमिनाथ रामकिसन चांगले

लोणार सरोवर हे जगातील एकमेव खा-या पाण्याचे सरोवर आहे. लोणार सरोवर महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील लोणार या तालुक्यात आहे.

लोणार सरोवर हे सध्या अभयारण्य म्हणून घोषीत करण्यात आले आहे. या सरोवरामध्ये जाण्याआधी वरच्या बाजुला एक गणपतीचे मंदिर आहे. आणि काशी या तीर्थक्षेत्राची धार या लोणार मध्ये येते. या धारेला पूर्वीपासूनच लोक लोणारची धार म्हणतात. या धारेच्या खालच्या बाजुला प्रभू श्रीराम यांची पत्नी सीता यांची सीता न्हाणी आहे. आजही येथे अनेक स्त्रिया सीता न्हाणी म्हणून स्नान करतात. या सीता न्हाणीमध्ये येणारे पाणी हे काशी या तीर्थक्षेत्राचे पाणी आहे म्हणून लोणार सरोवर पहायला जाणारे लोकं या न्हाणीच्या पाण्याने आपली तहान भागवतात. येथूनच लोणार सरोवरात खाली जायला मदत होते. यापुढे एक महादेवाचे कुमारेश्वर मंदिर आहे. लोणार सरोवरात उतरल्यानंतर जे कोणी लोक हे सरोवर बघण्याकरिता आलेले आहेत ते पहिल्यांदा कमळजा मातेचे दर्शन घेतात. कमळजा मातेच्या मंदिरामुळे या सरोवरामध्ये जाणा-यांची संख्या भरपूर आहे. नवरात्रीमध्ये कमळजा मातेच्या मंदिरात या सरोवरात नऊ दिवस यात्रा भरली जाते.

या सरोवरामध्ये परमपूज्य श्री.सखाराम महाराज यांनी साधना केली आहे. तसेच नेमिनाथ महाराजांनीसुद्धा. ब-याच मराठी चित्रपटांचे चित्रीकरण या सरोवराच्या निसर्गरम्य वातावरणात झालेले आहे. या सरोवरामध्ये दैत्यराजसूदन मंदिरसुद्धा आहे. समजा, सरोवरात फिरताना सडलेल्या किड्यांचा वास जर आला तर समजायचे हेच ते दैत्यराज सूदन मंदिर. या सरोवरामध्ये भरपूर पाणी आहे. तसेच या सरोवरामध्ये झाडे-झुडपेही भरपूर आहेत. पण तुलनेत निलगिरी व सीताफळाची झाडे जास्त प्रमाणात आहेत. येथेच एक भगवान हनुमानाचे भद्रा मारोती मंदिरही आहे. हे सरोवर पाहत असताना थोडाही कंटाळा येत नाही. उलट अधिकाधिक उत्साह निर्माण होतो.

या सरोवरामध्ये सहलीचा आनंद अत्यंत रमणीय आहे. या सरोवरामध्ये आतील मोकळ्या जागेत केळीचे मळे आहेत. हे सरोवर पाहण्यासाठी परदेशी पर्यटक भरपूर संख्येने येतात.

या सरोवराच्या डाव्या बाजुला मेहकर, उजव्या बाजुला तळणी व मंठा, समोरील बाजूस लोणी आणि मागील बाजूस गुंधा अशी गावे असून हे सरोवर एक पर्यटन स्थळच बनले आहे.

या सरोवरामध्ये असलेली शेवाले वैज्ञानिक दृष्टीने महत्त्वाचे आहेत. मागील उन्हाळ्यामध्ये अमेरिकन वैज्ञानिक या सरोवराच्या तळाशी गेले होते व तेथे त्यांनी या सरोवराचे संशोधन केले. या सरोवरात अनेक नैसर्गिक वनौषधी उपलब्ध आहेत.

■



# ग्रामीण जीवनात कारखान्याचे स्थान

- रामेश्वर तुकाराम टेंगसे

महाराष्ट्रात सहकाराचे वारे स्वातंत्र्य मिळाल्यापासून वाहू लागले आणि सहकार चळवळ जोर धरु लागली. महाराष्ट्रात सहकारी चळवळ रुजवायला सुरुवात पद्‌मश्री श्री.विठ्ठलराव विखे-पाटील यांनी केली आणि अशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे इ.स.१९५० साली उभा राहिला.

त्यानंतर सहकारी चळवळ महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सुरु झाली. श्री. यशवंतराव चव्हाण, श्री.वसंतदादा पाटील, श्री.वसंतराव नाईक,श्री. शरद पवार, श्री.तात्यासाहेब कोरे, श्री.भाऊसाहेब थोरात या भूमीपुत्रांनी पुढे चालवली व वाढविली.

आज रोजी महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक म्हणजे १६० सहकारी तर ५० खाजगी साखर कारखाने आहेत.

मराठवाड्यातील पहिला सहकारी कारखाना उस्मानाबाद जिल्ह्यात उभा राहिला. परभणी जिल्ह्यात पहिला सहकारी साखर कारखाना पाथरी येथे उभा राहिला. महाराष्ट्रातील विदर्भात महिलांनी पहिला राजमाता जिजाऊ सहकारी साखर कारखाना सिंदखेड जि.बुलढाणा येथे उभा केला.

ग्रामीण विकासाला चालना साखर कारखान्यामुळे मिळाली. एका साखर कारखान्यामुळे त्या पंचक्रोशीचा विकास व्हायला वेळ लागत नाही. सहकारी साखर कारखान्यांना सरकारची चांगली आर्थिक मदत होते त्यामुळे ऊसपट्ट्यात सहकारी चळवळ वाढली.

शेतक-याच्या ऊसाला चांगला भाव व बेरोजगारांना रोजगार देण्याचे काम सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून होते. आज साखर कारखान्यांनी केवळ ऊसापासून साखरनिर्मितीच नव्हे तर त्याचबरोबर वीजनिर्मिती, इथेनॉल निर्मिती, मद्यार्क निर्मिती आदि जोड उपक्रम करुन जास्तीत जास्त उत्पादन करुन चांगल्यात चांगला भाव देत आहेत.

आज महाराष्ट्रात वीज समस्येला सगळ्यांना तोंड द्यावे लागत आहे. मात्र सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून वीजनिर्मिती करुन ती कारखाना कार्यक्षेत्रात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. वीजनिर्मितीमुळे शेतक-याला वाढीव भाव देता येतो. त्याचप्रमाणे आज पेट्रोल-डिझेलच्या महागाईने सगळ्यांना हैरान केले आहे. पेट्रोलच्या किंमती सतत चढत-उतरत असतात. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर आयात खर्च करावा लागतो. आणि त्याच्या वापराने प्रदूषणही मोठ्या प्रमाणावर होते. मात्र पेट्रोलला पर्याय इथेनॉल आहे. यावर पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण १० टक्के च्या आसपास आहे ते प्रमाण वाढवायला पाहिजे.

सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून रस्ते व जलसंधारण यावर मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येतो. आज साखर कारखाने शेतक-यांना शेती रस्ते आणि पाण्याची सोय करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात चांगल्या सोयी निर्माण केल्या जात आहेत. एकुण या कारखान्यांच्या माध्यमातून सहकारातून सर्वांचा उद्धार होत आहे. ग्रामीण जीवनमान, शेतक-यांचा दर्जा सुधारण्यासाठी ते एक वरदान ठरत आहे. ■



## खेड्यातील सकाळ

- पांडुरंग भगवानराव ढेंगळे

किरणात चाळ बांधुनी आली उषा गं।।
झालं झुंजूमंजू उजळून आल्या दिशा गं।।

ग्रामीण जीवन हे शांतताप्रिय जीवन आहे. ग्रामीण भागामध्ये निसर्गरम्य वातावरण असते आणि कमी लोकसंख्या असल्यामुळे लोक आप-आपसात एकमेकांशी मिळून राहतात. ग्रामीण भागामध्ये सकाळच्या वेळी एक वेगळीच चाहूल असते. स्त्रिया पहाटे लवकर उठून आपल्या घराच्या अंगणामध्ये साफ-सफाई करतात आणि शेणाचा सडा टाकतात. घराभोवती असलेल्या झाडांना पाणी घालून आपल्या दारासमोर रांगोळी काढतात.

असे सुंदर दृश्य ग्रामीण भागात पहावयास मिळते. प्रत्येकजण आपल्या कामामध्ये व्यस्त असतो. सकाळच्या वेळी निसर्गरम्य वातावरणात गवतावर दवबिंदू दिसतात. अशा या दवबिंदूवर सूर्याचे कोवळे ऊन पडले की हे दवबिंदू आपणास मोत्यासारखे वाटतात. अशावेळी या सुंदर दृश्याला पाहून मन किती भारावून जाते. ग्रामीण भागाचा स्त्रियांचा विचार करत असताना स्त्रिया पावसाची प्रार्थना करतात, त्याची गाणी गातात. जात्यावरची गाणी गातात. त्यांचा मेळा अनुपम असतो. ग्रामीण भागामध्ये माणसे एकमेंकाशी प्रेमाने वागतात. त्यांच्यामध्ये ऐक्याची भावना असते. गावच्या सार्वजनिक कामामध्ये पुढे होऊन आपला सहभाग नोंदवतात. त्यामुळे गावाचा विकास होतो. अशा ग्रामीण भागात गावाला भेट देण्यास आलेल्या पाहुण्यांचे मोठ्या आदराने स्वागत करतात. अशा लोकांमध्ये एक वेगळीच भावना असते. ग्रामीण जीवनात वेगवेगळे प्रसंग असतात. वेगवेगळे उत्सव असतात. यामध्ये स्त्रियादेखील पुरुषांसोबत भाग घेतात. एकूण खेड्यातील वातावरण रम्य व प्रसन्न असते.

■



# ग्रामीण संस्कृती

- पांडुरंग ज्ञानोबा शेरे

सुदृढ शरीर आणि उल्हासभरे मन
खरचं किती सुंदर असतं ग्रामीण जीवन।
आई-वडिलांचा मान व मोठ्यांचा आदर ठेवणारे
सर्वांशी प्रेमाने वागून भारतीय संस्कृती जपणारे।

पशुपक्षी प्राण्यांनाच मानती ती देव
किती थोर कल्पना।
ग्रामीण संस्कृतीसारखी संस्कृती
कुठे सापडेल सांगा ना!

हिंदू-मुस्लिम, बौद्ध व जैन सर्वांना आहे समभाव
पुण्य-भक्ती-दान-धर्म करुन ठेवतात सारे देवावर भाव।

भिकारी असो वा साधुसंत संन्याशी
ग्रामीण भागातून जात नाही कुणी उपाशी।

वीज नाही, पाणी नाही किती बिकट अवस्था
सर्व दुःख विसरुन सुरु ठेवतात कामधंदा।
झाले कुणाचे भांडणतंटे तर निर्माण करतात एकता
जातपात सारे विसरुन दाखवतात सारे बंधुता।
आईला आई वडिलांना बाबा म्हणणारे
फॅशन पासून दूर राहून भारतीय संस्कृती जपणारे।

स्त्रियांच्या रुपात असो वा पुरुषांच्या रुपात
खरचं ग्रामीण संस्कृती आहे नंबर एक जगात।



## शेतकरी

- श्रीकांत गंगाधरराव जाधव

बंधु माझा शेतकरी मारतो शेतात नांगर,
फुटे अंगालाही त्याच्या घामाचा रे पाझर।
हातावर चटणीभाकर अन् संगे पाण्याची घागर,
नाही त्याले कुणाचाही आधार।
किंगफिशरसाठी फुटे सरकारला रे पाझर,
अन् शेतक-याला दिलं चॉकलेट कोटी दोन हजार।
सरकारला झाला या भ्रष्टाचाराचा आजार,
या भ्रष्टाचाराने केला पुरा भारत बेजार।
महागाईचा आला पूर,
त्याने केले गोर गरिबांना चुर-चुर।
बंधु माझा शेतकरी करतो जीवाचं रे रानं,
या रानातून तो पिकवतो सोनं।
या सोन्याला नाही रे भाव,
सावकार करतात खाव-खाव।
कर्जापोटी यानं विकले बैल आणि रानं,
करुन आत्महत्त्या गमावला आपला प्राण।
गमावला आपला प्राण.....



## नशीब

- अशोक शिवानंद चौधरी

नसतोच मुळी नशीबावर
विश्वास जरासा कोणाचा
समजत नाही हे कोणाला
क्षण नसतो, कधी क्षणाचा

क्षणात होता, क्षणात गेला
म्हणतात हे मग सर्व
कधी करु नये
मी पणाचा गर्व
म्हणतात लोक, नशीब
अगोदरच ठरतं
आपण मात्र ते
स्वतः बनवायचं असतं



## जरा हसूया !

- एच.एस.व्ही.सी. सर्व विद्यार्थी

■ माझ्या मुलीला डॉक्टर व्हायचं होतं. शेवटी ती झाली. 'अरे वाऽऽ पण ती तर दहावीलाच नापास झाली होती ना' ! हो पण तिने एका डॉक्टराशी लग्न केलं ना!

■ एकदा एका मुलाने त्याच्या वडिलांना प्रश्न विचारला 'पप्पा, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करात फरक काय ?' तेव्हा त्यांच्या वडिलांनी उत्तर दिले. तुझी आई विचारुन पैसे घेते तो प्रत्यक्ष आणि न विचारता घेते तो अप्रत्यक्ष कर.

■ बायकोला घाबरणा-या संजुने विचारले, 'तुझी बायको कशाला घाबरते ?' उंदराला, 'गण्या म्हणाला. मग पुढच्या जन्मी तू उंदीर हो म्हणजे तुला ती घाबरेल'. संजुने प्रस्ताव दिला. पण तेव्हा ती पुढच्या जन्मी मांजर झाली तर......

■ एका कापड दुकानात आलेल्या एका ग्राहकाने दुकानदारास विचारले, कापडाचे सर्व प्रकार पाहिले. अति चिकित्सेमुळे मालक वैतागला आणि शेवटी एक छत्री ग्राहकाने पसंत केली आणि विचारले 'ही छत्री किती दिवस टिकेल'. दुकानदार म्हणाला, 'उन्हात,पावसात व वा-यात घेऊन न जाता ही शंभर वर्ष टिकेल याची गॅरंटी देतो, घ्या'.

■ घरमालक म्हणाले, "तुमचे चार वर्षाचे भाडे थकले आहे आणि तुम्ही फक्त शंभर रुपये देत आहात ?" त्यावर एक भाडेकरु म्हणाला, "मागचा दरवाजा विकला. त्याचे एवढेच पैसे आले त्याले मी काय करु ?"



## बहार

- कृष्णा नामदेवराव वाघमोडे

आसमंत हा सारा
बहरला असा
बेधुंद झाली धरणी
फुलवून मोर पिसा

तृप्त झाली धरणीमाता
सजवूनी सारी काया
बेधुंद नाजुक मनातल्या
बोलत्या झाल्या छाया

वा-याची शीतल झुळूक
स्पर्श तो फुलला
डोलणारा भाव हळूच
हर्षतो मनाला

क्षणा-क्षणांची नाती जमती
सांज वेळ संगतीत
अन् भान विसरुनी जाती
येताच आनंदाच्या भरती

# ग्रामीण संस्कृतीतील ओवी

- प्रिती सिंगारे (संकलन )

१) आताच्या गं जमान्यात
भाऊ नाही बहिणीचा
वाडा पुसं मेहुणीचा।।

२) गुरुचा मंत्र भरीले महे कान
स्वर्गाचं विमान, यम चालले दुरुन

३) लेक चालली सासरी, हिनं वलांडला माथा
हात जोडी स-या गोता, धर्माची झाली आता

४) पंढरीला येढा चंद्रभागाच्या पाण्याचा
विठ्ठलाच्या राऊळाला देला गिलावा सोन्याचा

५) नवरीचा बाई मामा ओळखू गं कोण्यापरी
लाल झापा पाठीवरी

६) सोन्याचे हे गं जातं,
याला मोतियाचा डावं
सुहासिनी हात लावं

७) सोन्याची गं ही मुंदी कशानं गं झिजली
आनंद गं या बाळानं राशी गव्हाची मोजली.

८) खडीसाखरेचा खडा, बाळा तुला कोणी देला
दारावरुन मामा गेला

९) हे गं मांडव बांधिला चारी कोपरे सांधून
बाप स्वतः उभा कंबर बांधून

१०) माहेराला गेले बाई, माहेराचा डौल कसा
भावाआधी बोलं भासा, आत्याबाई खाली बसा.

# महात्मा गांधी तंटामुक्त गाव
# पुरस्कार प्राप्त सरपंचाची मुलाखत

परिचय : **किशोर बापूराव चव्हाळ**
वय : ३९ वर्ष
गाव : मोरेगांव, ता.सेलू.जि.परभणी
शिक्षण : बी.ए.



**प्रश्न : आपले प्रेरणास्थान कोण आहेत ?**
उत्तर : श्री विनायकराव गंगाधरराव खंडागळे व माझे वडील श्री. बापूराव चव्हाळ हे राजकारण, समाजकारणात सक्रिय आहेत. तेच माझे प्रेरणास्थान आहेत.

**प्रश्न : राजकारणात कसे आलात ?**
उत्तर : वडिलांचा वारसा आणि मुळातच मला समाजकार्याची आवड असल्याने तसेच विकासकामे करण्याच्या तळमळीतून मी या क्षेत्रात आलो. मात्र मी केवळ राजकारणी म्हणून काम करीत नाही तर समाजकारण हे प्रमुख ध्येय आहे.

**प्रश्न : तुम्ही केलेली कामे कोणती ?**
उत्तर : गावामध्ये पाणी, रस्ते, अज्ञान अशा काही समस्या असतात. त्या दूर करण्यासाठी मी प्रयत्न केले. गावात सिमेंट रस्ते, भारत निर्माण योजनेअंतर्गत पाण्याची टाकी, नळ, नाल्या तसेच दारुबंदी, वीजबचतीसाठी सी.एफ.एल. बल्ब, स्वच्छतेसाठी धुरळण यंत्राचा वापर इत्यादी विशेष कामे सांगता येतील. विशेष म्हणजे मोरेगांव ग्रामपंचायत ही पूर्णपणे ऑनलाईन केलेली आहे. माझ्या मते तालुक्यातील अशी पहिली ग्रामपंचायत असेल.

**प्रश्न : कामे करतांना कोणत्या अडचणी येतात ?**
उत्तर : माझ्या गावात मला सर्वांचे सहकार्य लाभते. मात्र लोकांची वैयक्तिक लाभाची मनोवृत्ती व कुटिल राजकारण या बाबी बरेचदा विकासात अडसर निर्माण करतात.

**प्रश्न : सार्वजनिक क्षेत्रात काम करतांना कोणते अनुभव आले ?**
उत्तर : तसे अनुभव अनेक आहेत. शासनाच्या आरोग्य खात्याचे सहकार्य ग्रामपंचायतींना पुरेसे लाभत नाही. तसेच ग्रामपंचायती आर्थिक अडचणीत असतात. शासनाच्या तुटपुंज्या अनुदानावर अनेक कामे करावी लागतात.

**प्रश्न : आपल्या ग्रामपंचायतीस काही पुरस्कार मिळाले आहेत का ?**

उत्तर : शासनाचा सन २०१० सालचा महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेचा जिल्हास्तरीय तृतीय क्रमांकाचा (रु. तीन लाख) पुरस्कार आम्हाला प्राप्त झाला आहे. मात्र पुरस्कारासाठी आम्ही काम करीत नाही. गावाचा विकास व उन्नती हाच आमचा सर्वोच्च पुरस्कार आहे.

**प्रश्न : ग्रामीण विकासाबाबत आपली भूमिका काय आहे ?**

उत्तर : शेती हा ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय आहे. मात्र शेतीतील पारंपारिक पिके व तंत्रज्ञानाचा वापर यामुळे हा व्यवसाय तोट्यात येत आहे. आधुनिक शेतीचे ज्ञान मिळण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षणात कृषिविषय सक्तीचा करण्यात यावा. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीला दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन आदि लघु उद्योगांची जोड द्यावी. शेडनेटचा वापर, भाजीपाला पिके, फळबागा आदि विषयी शेतक-यांना माहिती मिळाली पाहिजे. तसेच गावाच्या विकासासाठी संरपच हा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून सरपंच पदासाठी शिक्षणाची अट असली पाहिजे. सरपंच किमान पदवीधर असला पाहिजे. जेणेकरुन गावाला प्रभावी व विकसनशील नेतृत्त्व मिळू शकेल.

**प्रश्न : भविष्यातील तुमच्या काय योजना आहेत ?**

उत्तर : भविष्यात गाव हागणदारी मुक्त करावयाचे आहे. तसेच गावात शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, व्यवसाधीनतेबाबत जनजागृती करणे आदि कामे करावयाची आहेत.

**ग्रामीण संस्कृतीतील प्रमुख सण**

- वटपौर्णिमा
- नागपंचमी
- रक्षाबंधन
- पोळा
- ईद
- गौरी गणपती
- मंगळागौर
- दसरा
- दीपावली
- भाऊबीज
- मकर संक्रांत
- होळी
- गुढीपाडवा
- अक्षय तृतीया

**ग्रामीण संस्कृतीतील प्रमुख पदार्थ**

- पिठलं भाकरी
- ठेचा (झुणका)
- घुग-या
- कडबोळी
- पुरणपोळी
- शेवया
- शेंगुळे
- धपाटे
- धिरडे
- आंबिल
- भरीत रोडगा
- घोटा
- तेलची
- कोंदीची पोळी
- येसर गोळे
- पातोड्या
- चमकु-याच्या वड्या
- मासोड्या



# अहवाल
## असे होते शैक्षणिक वर्ष २०११-१२

**विद्यार्थी उपक्रम समिती**
**वार्षिक अहवाल**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध अभ्यासपूरक उपक्रम घेण्यासाठी महाविद्यालयात विद्यार्थी उपक्रम समिती कार्य करते. या समितीमार्फत वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ या वर्षात समितीमार्फत घेतलेल्या विविध कार्यक्रमांचा थोडक्यात अहवाल पुढीलप्रमाणे-

■ दि. २९ जुलै २०११ रोजी 'स्वच्छता अभियान जि.प.परभणी' तर्फे आयोजित तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सेलू तालुक्यातून महाविद्यालयाच्या वरिष्ठ गटातून प्रथम आलेल्या विज्ञान द्वितीय वर्गाची विद्यार्थिनी कु. दिव्या शाममोहन त्रिपाठी हिने रोख ५०००/- रुपयाचे पारितोषिक प्राप्त केले.

■ दि. १९ सप्टें. २०११ रोजी युवक महोत्सवासाठी विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेण्यात आली.

■ दि. १६ ते १९ ऑक्टो. २०११ या कालावधीत 'कुसुमांजली - २०११' लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,, धर्माबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या एकूण १३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यात 'विडंबन अभिनय' स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

■ कु. रुपाली कान्हेकर व गौरव कान्हेकर या विद्यार्थ्यांची इंद्रधनुष्य आंतरविद्यापिठीय युवक महोत्सवासाठी निवड झाली.

■ पंकज जैस्वाल या विद्यार्थ्याने इंद्रधनुष्य आंतरविद्यापिठीय युवक महोत्सवात व उदयपूर येथे

झालेल्या विभागीय स्पर्धेत विडम्बन, एकांकिका, मुकनाट्य या स्पर्धेत सहभाग नोंदवला. विडम्बन या कला प्रकारात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संघास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक या दोन्ही ठिकाणी प्राप्त झाले. यामध्ये सहभागी संघामध्ये पंकज जैस्वाल या विद्यार्थ्याचा सहभाग होता.

■ दि. २६ नोव्हे.२०११ रोजी भारतीय संविधानाचे हीरक महोत्सवी वर्षानिमित्त 'भारतीय संविधान' या विषयावर स्वर्गीय नितीन महाविद्यालय, पाथरी येथील डॉ. आनंद इंजेगावकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

■ दि. ४ जाने. २०१२ रोजी श्री.शिवाजी विधी महाविद्यालय,परभणी येथे मराठवाडास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात कु. त्रिपाठी दिव्या हिने परभणी जिल्ह्याचे प्रथम क्रमांकाचे रोख रु. ३००१/- चे पारितोषिक प्राप्त केले.

■ दि. १२ जाने. २०१२ रोजी राष्ट्रमाता जिजामाता जयंती, स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थी उपक्रम समिती व करिअर कौसंलिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ॲड. सोमाणी यांनी विद्यार्थ्यांना 'व्यवसाय मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन केले.

■ दि. ३० जाने. २०१२ रोजी. कै.रावसाहेब जामकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कु. दिव्या त्रिपाठी हिने द्वितीय क्रमांकाचे रोख रु. २००१/- चे पारितोषिक प्राप्त केले.

■ दि. ०२ फेब्रू. २०१२ रोजी युथोपिया - २ विभागीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत महाविद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

■ श्री.धनंजय सरदेशपांडे यांना अब तुम्हारे हवाले या एकांकिकेसाठी उत्कृष्ट कथानकाचा पुरस्कार (उत्तेजनार्थ) प्राप्त झाला.

■ दि. १६ व १७ फेब्रू. २०१२ या दरम्यान महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.

■ दि. २८ फेब्रू. २०१२ रोजी कै. कमलाताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथे जिल्हास्तरीय Soft Skill & Personality Development कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत विज्ञान व कला शाखेतील पाच विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

■ ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी येथे मराठवाडा पातळीवर झालेल्या पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या कु. स्नेहल झंवर, कु. कुंडीकर, कुकरेजा सागर व प्रतिक रुगले यांनी सहभाग घेतला होता. यात प्रतिक रुगले यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

या शिवाय वर्षभर महापुरुषांच्या जयंती, स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व गोष्टींमध्ये समितीचे सदस्य प्रा.बैनवाड व प्रा.झोडगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**राष्ट्रीय सेवा योजना**
**राष्ट्रीय सेवा योजना पथकाचा संक्षिप्त अहवाल.**
**वरिष्ठ महाविद्यालय**

युवक व युवतींना संस्काराकडून संस्कृतीकडे घेऊन जाणारी योजना म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. ज्ञानार्जनाबरोबरच स्वावलंबन चारित्र्यसंवर्धन व सामाजिक बांधिलकी यांचा युवा मनावर संस्कार व त्यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा या दृष्टीने सुरु झालेली ही एक विधायक चळवळ होय. या योजनेच्या माध्यमाने श्रम प्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी, परस्पर सहकार्य, प्रामाणिकपणा, त्याग, सेवाभावीवृत्ती व देशभक्ती अशा अनेक गुणांचा सहजच विकास होतो. महाविद्यालयीन युवक-युवतींच्या अंगी असलेली अफाट शक्ती विधायक, रचनात्मक कार्यात वापरली जावी असा प्रयत्न राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमातून केला जातो. शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने खालील विविध उपक्रम राबविण्यात आले.

■ दि. १८/०४/२०११ रोजी स्वयंसेवकांची यादी पॅरालिगल व्हॉलेन्टिअर म्हणून मा.दिवाणी न्यायाधीश क स्तर सेलू यांना देण्यात आली.

■ दि. १८/०५/२०११ रोजी चि.अशोक मोगरे व चि. ऋषिकेश जोगदंड हे स्वयंसेवक आव्हान चॅलेन्जर्स ब्रिगेड : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या पूर्वनिवड चाचणीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सहभागी झाले.

■ दि. ०६/०६/२०११ ते १५/०६/२०११ दरम्यान सोलापूर विद्यापीठ येथे विद्यापीठ परिसरात आयोजित राज्यस्तरीय आव्हान चॅलेन्जर्स ब्रिगेड : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात चि. अशोक मोगरे व चि. ऋषिकेश जोगदंड या स्वयंसेवकांचा सहभाग.

■ दि. ०८/०७/२०११ रोजी पॅरालिगल ट्रेनिंग व अँटी रॅगिंग कायदेविषयक शिबिराबाबत मा.दिवाणी न्यायाधीश क स्तर सेलू यांनी आयोजित केलेल्या बैठकीस राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.उत्तम राठोड हे उपस्थित होते.

■ दि. २३/०७/२०११ रोजी मा.न्यायाधीश श्री.देशमुख साहेब यांचे पॅरालिगल ट्रेनिंग व अँटी रॅगिंग कायदेविषयक शिबिरात मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.

■ दि. ०८/०८/२०११ रोजी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण व

जनजागरण शिबीर आयोजित करण्यात आले. ग़क्ड्क़ पथकामार्फत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

■ दि. ०९/०८/२०११ रोजी क्रांतीदिन व मा.ॲड.व्ही.एस.खारकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर लोकमान्य ब्लड बँक, औरंगाबाद यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले. (५० रक्तदान व ९८ रक्तगट तपासणी)

■ दि. १६/०८/२०११ कार्यक्रमाधिकारी डॉ.उत्तम राठोड हे पालम येथे जिल्हास्तरीय कार्यक्रमाधिका-यांच्या वार्षिक कार्यक्रम नियोजन बैठकीस उपस्थित राहिले.

■ दि. २३/०८/२०११ रोजी चि. ढाले विकास व चि.मोगरे अशोक हे स्वयंसेवक माधवराव पाटील महाविद्यालय,पालम जि. परभणी येथे प्रजासत्ताक दिन संचलन निवडपूर्व परभणी जिल्हास्तरीय निवड शिबिरात सहभागी झाले.

■ दि. ०७/०९/२०११ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्‌बोधन शिबीराचे आयोजन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा.डी.एन.गायकवाड व प्रा.के.डी.वाघमारे हे होते. अध्यक्ष म्हणून प्रा.श्रीमती एच.के.बायस या उपस्थित होत्या. सूत्रसंचलन व प्रास्ताविक डॉ.उत्तम राठोड तर आभार प्रा.श्रीमती एच.ए.जोशी यांनी मानले.

■ दि. ०९/०९/२०११ रोजी मा.प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

■ दि. १५/०९/२०११ ते १९/०९/२०११ या दरम्यान आयोजित जिल्हा युवक व युवती नेतृत्व शिबीर बी.रघुनाथ महाविद्यालय, परभणी येथे चि.राम बुधवंत व चि.क़ारके ज्ञानेश्वर यांचा सक्रिय सहभाग राहिला.

■ दि. ०२/१०/२०११ रोजी म.गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त माजी उपप्राचार्य प्रा.प्रभाकरराव रावते यांचे व्याख्यान प्रभारी प्राचार्य प्रा.यादवराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले.

■ दि. ०८/१०/२०११ रोजी मा.डॉ.अरुण रोडगे, अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय,सेलू यांचे 'सुरक्षित रक्त व स्वेच्छा रक्तदानाचे महत्त्व' या विषयावर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले.

■ दि. २९ व ३० नोव्हेंबर, २०११ रोजी के.के.एम.महाविद्यालय, मानवत जि. परभणी येथे आयोजित सर्वोदय यवक प्रबोधन शिबिरात चि.पौळ महादेव, गडदे कैलास, जंगले अमोल, शेरे पांडुरंग, सावंगीकर नकुल या स्वयंसेवकांचा सक्रिया सहभाग राहिला.

■ दि. ०४/०१/२०१२ सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थांचे उत्पादन व सेवनमुक्त महाअभियान १४ नोव्हें. ११ ते २५ जाने १२ निमित्त प्रतिज्ञा घेण्यात आली.

दि. ०५/०१/१२ 'एका नावेचे प्रवाशी' या पुस्तकावर चाचणी परीक्षा घेण्यात आली. यात एकूण ३९ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात जाधव विशाल प्रथम तर जाधव गोविंद द्वितीय आले.

■ दि. ०७ जाने. ते १३ जाने १२ दरम्यान जवळा जिवाजी ता.सेलू.जि.परभणी येथे रा.से.यो. चे विशेष वार्षिक शिबीर घेण्यात आले.

■ दि. २६/०१/१२ प्रजासत्ताक दिनी कु.महाजन व संच यांनी प्रजासत्ताकदिन विशेषांक हे भित्तीपत्रक तयार केले.

■ दि. २८ फेब्रू. व २९ फेब्रू. १२ रोजी १७ डॉक्टरांच्या मदतीने १२७५ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

वर्षभरातील वृक्षारोपण, पल्स पोलिओ, एड्स जनजागरण या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग असतो.

**वरिष्ठ महाविद्यालय**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**'पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन, आरोग्य व स्वच्छता शिबीर'**
**दि. ७ जाने ते १३ जाने २०१२ मौजे जवळा जिवाजी. विशेष वार्षिक शिबीर अहवाल**

■ दि. ०७ जाने. शनिवार रोजी महाविद्यालयातून जवळा जिवाजी येथे आगमण झाले. संध्याकाळी ग्राम सभा घेऊन परिचय व शिबीरासंबंधी माहिती दिली.

■ दि. ०८ जाने. सकाळी ०५.३० ते ०७.३० या वेळेत प्राणायाम योगासने, व्यायाम व कवायती घेण्यात आल्या. यात  व्याख्यान प्रभारी प्राचार्य प्रा.यादवराव पतंजली योग समितीचे सदस्य श्री. चंदरशेठ सांगताणी, काकडे, सुखनाणी, पाटील इ. च्या मार्गदर्शनाखाली गावकरी, शिबीरार्थी, सहभागी होते.

■ सकाळी ११.०० वा. उद्घाटन समारंभ कार्याक्रमासाठी अध्यक्ष म्हणून नू.वि.शि.संस्था सेलू चे अध्यक्ष डॉ.श्री.एस.एम.लोया हे उपस्थित होते. तसेच उद्घाटक म्हणून वसंतराव नाईक महाविद्यालय,नांदेड चे डॉ.पी.एल. चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत महाविद्यालय,नांदेडचे डॉ.शिवराज बोकडे हे उपस्थित होते. तसेच नूतन महाविद्यालय सेलूचे प्रा.यादवराव गायकवाड यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला.

दुपारी महिला मेळावा या कार्यक्रमासाठी सौ. पूनम खत्री यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थिनींचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. रात्री कवी संमेलनात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता.

■ दि. ०९ जाने. सकाळी प्राणायाम, योगा, कवायती इ. पंतजली योग समितीचे श्री.गजमल यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. सकाळी ०९ ते १२.०० या वेळेत श्री.जिवाजी जवळा महाराज संस्थानचे भक्त निवास क्र. ०२ येथील परिसर स्वच्छता व झाडांना आळे करण्यात आले. तसेच आरोग्य तपासणी शिबीरात डॉ. गणेश मुळे व डॉ.कु.लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली १४० रुग्णांची आरोगय तपासणी करुन औषधी (गोळ्या, डोळ्याचे ड्रॉप) वाटप करण्यात आले.

दुपारच्या सत्रात 'बेटी बचाओ देश बचाओ' या विषयावर प्रा. पिंपळगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री.हिवाळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच 'पर्यावरण संवर्धनात युवकांची भूमिका' या विषयावर प्रा.शेप यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली गटचर्चा संपन्न झाली. संध्याकाळी जवळा जिवाजी येथील गावक-यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

दि. १० जाने. सकाळी प्राणायाम, योगा व कवायती इ. पंतजली योग समितीचे श्री.सांगताणी, सौ. खत्री, पाटील, काकडे इ. मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. सकाळी ०९ ते १२ या कालावधीत भक्त निवास क्र.०२ परिसर साफसफाई करण्यात आली. तसेच पशुरोग

चिकित्सा शिबीरात डॉ.अमलवार यांच्या मार्गदर्शनाखाली १६१ पशुंची तपासणी करण्यात आली. तसेच डॉ. लोखंडे यांनी पशू रोग या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

दुपारच्या सत्रात डॉ. खाडप यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.बैनवाड यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वांतत्र्याच्या हीरक महोत्सवी वर्षानंतर भारतीय राज्यघटनेची प्रासंगिकता' या विषयावर गटचर्चा संपन्न झाली.

संध्याकाळी देशभक्तीपर गीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

■ दि. ११ जाने. सकाळी प्राणायाम, योगा, कवायती इ. पतंजली योग समितीचे सदस्य श्री.काकडे, श्री.सुखनानी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. सकाळी ०९ ते १२.०० या कालावधीत श्रमदानात गावातील रस्ते स्वच्छ करण्यात आले. त्यानंतर श्री.फंड त्यांच्या मळ्यात **वनभोजन** झाले.

दुपारच्या सत्रात प्रा.शेरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.कंठाळे यांनी 'औषधी वनस्पतीची ओळख' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच 'शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान' या विषयावर प्रा.हेसे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.डी.बी.गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

संध्याकाळी प्रा.ए.डी.कुलकर्णी व संच यांनी संगीत रजनी (सुनहरी यादें) कार्यक्रम सादर केला.

■ दि. १२ जाने. रोजी सकाळी कार्यक्रम अधिकारी डॉ. राठोड, प्रा.टेंगसे, प्रा.काजळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणायाम, योगा इ. संपन्न झाले. तसेच ०९ ते १२.०० या वेळेत श्रमदानात रस्ते व नाल्या स्वच्छ करण्यात आल्या.

दुपारच्या सत्रात राष्ट्र निर्माणात युवकांची भूमिका या विषयावर प्रा. झोडगे, डॉ. जगन्नाथ जाधव व डॉ. महेंद्र शिंदे यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रा.साळेगावकर व प्रा.मदने यांनी नौकरी संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संध्याकाळी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम (शेकोटी) संपन्न झाला.

■ दि. १३ जाने. सकाळी डॉ. राठोड, प्रा.टेंगसे व प्रा. काजळे यांनी कवायती, प्राणायाम योग इत्यादी विषयी माहिती दिली. तसेच 'व्यसनमुक्ती काळाची गरज' या विषयावर श्री.राठोड सुदाम व श्री.गोरे देविदास यांनी मार्गदर्शन केले.

दु. ०२.०० वा. समारोप समारंभ प्रसंगी अध्यक्ष म्हणून नू.वि.शि.संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ.व्ही.के.कोठेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव श्री.डी.के.देशपांडे व प्रा.वाय.आर. गायकवाड हे उपस्थित होते.

समारोप समारंभानंतर संध्याकाळी शिबीरार्थींचे महाविद्यालयाकडे प्रयाण झाले.

## क्रीडा विभाग
## वार्षिक अहवाल
## ज्येष्ठ महाविद्यालय

■ दि. २३ जुलै २०११ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे क्रीडा मंडळाच्या बैठकीत आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा कार्यक्रम तयार करण्यात आला.

■ दि. २६ जुलै २०११ रोजी मा.प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली क झोन आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम ठरविण्यात आला. या बैठकीस परभणी जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा प्राध्यापक उपस्थित होते.

■ दि. ८ ऑगस्ट २०११ रोजी महाविद्यालयात क झोन टेबलटेनिस व बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने या दोन्ही स्पर्धेत सहभाग घेऊन यश संपादन केले. क झोन बॅडमिंटन आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. या विजयी संघात घायतडक जितेश, म.इम्तीयाज, इंगोले आनंद, घायतडक ऋषीकेश, कुरेशी सलमान यांचा सहभाग होता.

क झोन आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. या उपविजयी संघात घायतडक जितेश, आडळकर पवन, जोरगेवार दीपक, सुरवसे रविकुमार यांचा सहभाग होता.

■ दि. ११,१२ ऑगस्ट २०११ या कालवधीत नांदेड येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत घायतडक जितेश, आडळकर पवन, जोरगेवार दीपक, सुरवसे रविकुमार यांनी सहभाग घेतला. तर बॅडमिंटन स्पर्धेत घायतडक जितेश, म.इम्तियाज, इंगोले आनंद, घायतडक ऋषीकेश, कुरेशी सलमान यांनी सहभाग घेतला.

■ दि. २४,२५ ऑगस्ट २०११ या कालावधीत श्री. शिवाजी महाविद्यालय,परभणी येथे क झोन आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने सहभाग घेतला व उपांत्य फेरी गाठली. अतिंम सामन्याच्या दरम्यान पावसाला सुरुवात जाली. उर्वरीत सामने दि. १५ सप्टे. २०११ रोजी घेण्यात आले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्य ासंघाने द्वितीय क्रमांक मिळविला. या उपविजयी संघात घायतडक ऋषीकेश, घायतडक जितेश, म.इम्तीयाज, इंगोले आनंद, जोरगेवार दीपक, सुरवसे रविकुमार, देशमुख श्रीकांत, तोटरे प्रकाश, सुरवसे अमोल, ठाकुर संजयसिंग, चव्हाण पंकज यांचा समावेश होता. संघान मार्गदर्शन स्वप्नील राठोड याने केले.

■ दि. २८,२९ सप्टे. २०११ या कालावधीत ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी येथे संपन्न झालेल्या क झोन मैदानी क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या म.इम्तीयाज, राठोड अर्जुन, राठोड विनोद या खेळाडूंनी लांबउडी, १०० मी. धावणे, ५००० मी धावणे, गोळाफेक या स्पर्धेतत सहभाग नोंदविला.

■ दि. १२,१३ नोव्हें. २०११ या कालवधीत लालबहाद्दूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल क्रीडास्पर्धेत महाविद्यालयाच्या घायतडक ऋषीकेश, घायतडक जितेश,म. इम्तीयाज, इंगोले आनद, जोरगेवार दीपक, सुरवसे रविकुमार, देशमुख श्रीकांत, तोटरे प्रकाश, सुरवसे अमोल, ठाकुर संजयसिंग, चव्हाण पंकज या खेळाडुंनी परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करुन सहभाग नोंदविला.

■ दि. १६ नोव्हे. २०११ पासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या विद्यापीठ व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबीरासाठी घायतडक ऋषीकेश, याची निवड झाली. त्याने प्रशिक्षण शिबीरात सहभाग घेतला.

■ दि. २६ डिसें. २०११ रोजी हडोळती जि. लातूर येथे संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत महाविद्यालयाच्या खरात राजेश, म. इम्तीयाज,

देशमुख श्रीकांत यांनी सहभाग घेतला. देशमुख श्रीकांत याने इपी या गटात द्वितीय क्रमांक मिळविला व तो सिल्व्हर मेडलचा मानकरी ठरला.

■ दि. १५ व १६ जाने. २०१२ रोजी श्री.शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे संपन्न झालेल्या सॉफ्टबॉल आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत म.इम्तीयाज, सुरवसे रविकुमार, इंगोले आनंद, सुरवसे अमोल, घायतडक जितेश, घायतडक ऋषीकेश, जोरगेवार दीपक, तोटरे प्रकाश, ठाकुर संजयसिंग, होकर्णे अभिषेक, गजमल मुकुंद, वैद्य योगेश, चव्हाण शिवाजी, चव्हाण पंकज या मुलांच्या संघाने सहभाग घेतला.

■ दि. २७ फेब्रु. २०११ पासून स्वामी रामानदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड येथे सुरु झालेल्या तलवारबाजी प्रशिक्षण शिबीरात देशमुख श्रीकांत याने सहभाग घेतला. व त्याची निवड स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघात झाली. दि. ७ मार्च २०१२ पासून कोईम्बत्तूर (तामिळनाडू) येथे झालेल्या आंतरविद्यापिठीय तलवारबाजी स्पर्धेत त्याने स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड संघाचे प्रतिनिधीत्व केले.

## कनिष्ठ महाविद्यालय
## क्रीडा विभाग

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील क्रीडा विभागाने उत्कृष्ट कामगिरी केली. यावर्षी ५ शालेय राज्यस्तरीय खेळाडुंसोबत ४६ खेळाडुंनी विविध संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेतला. एक गोल्ड, राज्यस्तरावर दोन सिल्व्हर, तीन ब्रान्झ पदकांची कमाई करीत ५१ खेळाडुंनी राज्यस्तरावर सहभाग नोंदविला व एका खेळाडुने शालेय राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करीत सहभाग घेतला व ब्रान्झपदक पटकाविले.

■ एप्रिल २०११ मध्ये संघटनेच्यावतीने नाशिक येथे घेण्यात आलेल्या खुलागट पुरुष खो-खो राज्यस्तरीय स्पर्धेत संतोष शेटे, अनंता साळवे, बाबुराव कंजे, किशोर साळवे यांनी सहभाग घेतला.

■ २ जुलै २०११ रोजी नू.वि.शि.सं.सेलूच्या वतीने राष्ट्रीय पदकप्राप्त खो-खो खेलाडू शेटे संतोष, साळवे अनंता, तलवारबाजी खेळाडू देशमुख नारायण, टे.व्हॉ. खेळाडू म.इम्तीयाज, इंगोले आनंद, जोरगेवार दीपक, इंगोले अजय यांचा सत्कार करण्यात आला.

■ दि. २१ जुलै २०११ रोजी नूतन कन्या प्रशाला येथे तालुका क्रीडा स्पर्धा नियोजन बैठक संपन्न झाली व तालुका क्रीडा स्पर्धा कार्यक्रम ठरविण्यात आला.

■ दि. २९ जुलै. २०११ रोजी १९ वर्षाआतील तालुका स्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा महाविद्यालयात संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या सहजराव राजवैभव, काकडे तुषार, शेख अलिम, बेग अक्रम, देशमुख गोपी, जाधव कार्तिक, आकात सतीश, शेळके अभिलाष, डुकरे सुशील, पवार अक्षय, मगर सुरज, भांडवले निरज या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळविला.

■ दि. ३ ऑगस्ट २०११ रोजी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत सहजराव राजवैभव, काकडे तुषार, शेख अलिम, बेग अक्रम, देशमुख गोपी, जाधव कार्तिक, आकात सतीश, शेळके अभिलाष, डुकरे सुशील, पवार अक्षय, मगर सुरज, भांडवले निरज या खेळाडुंनी सहभाग घेतला.

■ दि. ३ ऑगस्ट २०११ रोजी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय महिला जलतरण स्पर्धेत कदम रोशनी, हिचा सहभाग.

■ दि. ६ ते ८ ऑगस्ट २०११ या कालावधीत जालना संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत मगर श्वेता हिने सहभाग घेतला.

■ दि. ९ ऑगस्ट २०११ रोजी २० नवीन खेळांच्या संदर्भात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी येथे झालेल्या बैठकीत महाविद्यालयाच्या प्रतिनिधीचा सहभाग.

■ दि. १९ ते २१ ऑगस्ट २०११ या कालावधीत पुणे येथे संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत देशमुख ऋषीकेश याचा सहभाग.

■ दि. २३,२४ ऑगस्ट २०११ या कालवधीत २० नवीन खेळ प्रशिक्षण शिबीर परभणी येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न झाले. यात महाविद्यालयाच्या प्रतिनिधीचा सहभाग.

■ दि. २९ ऑगस्ट २०११ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

■ दि. १ सप्टे. २०११ रोजी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय शिकाई स्पर्धेत ढाले दीपक, डंबाळे सुनिल यांनी सहभाग घेतला.

■ दि. ३,४ सप्टे. २०११ या कालावधीत कवठे महाकाळ येथे संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय सबज्युनिअर टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत पंच म्हणून कार्य.

■ दि. १४ सप्टे. २०११ रोजी तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत पंच म्हणून कार्य.

■ दि. १६ सप्टे. २०११ रोजी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉक्सींग स्पर्धेत कु. शेंडगे स्वाती व झोल रामेश्वर यांनी सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला.

■ दि. १९ सप्टे. २०११ रोजी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय टेबलटेनिस स्पर्धेत महाविद्यालयाच्या रत्नपारखी आदित्य, टाकळे रोहन, सानप पवन, देशमुख ऋषीकेश या खेळाडुंनी सहभाग घेतला.

■ दि. २१ सप्टे. २०११ रोजी के.के.एम. मानवत येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत पंच म्हणून कार्य.

■ दि. २४ सप्टें. २०११ रोजी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय तरवारबाजी स्पर्धेत देशमुख नारायण व सहजराव राजवैभव यांनी सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला.

■ दि. २६,२७ सप्टें. २०११ या कालावधीत ग्रामीण गट पायका अंतर्गत तालुकास्तरीय खो-खो, व्हॉलीबॉल, मैदानी क्रीडा स्पर्धा, कबड्डी क्रीडा स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले.

■ दि. ३० सप्टे. व १ ऑक्टो. २०११ या कालावधीत बीड येथे झालेल्या विभागीय शालेय बॉक्सींग स्पर्धेत परभणी जिल्ह्याचे शेंडगे स्वाती व झोल रामेश्वर यांनी प्रतिनिधीत्व केले व विभागीय स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

■ दि. ७ ऑक्टो. २०११ रोजी तालुकस्तरीय शालेय कुस्तीस्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले.

■ दि. ८ ऑक्टो. २०११ रोजी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यातआले. या स्पर्धेत १०० मी. धावण्याच्या स्पर्धेत राठोड देविदास याने प्रथम तर साठे जीवन याने द्वितीय क्रमांक पटकाविला. राठोड देविदसा हा २०० मी. धावण्याच्या स्पर्धेत देखील प्रथम आला. बुधवंत अमोल याने ४०० मी. धावण्याच्या स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त केला तर कुंभार नारायण याने ८०० मी. धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. ढाले दीपक याने ३००० मी. धावण्याची स्पर्धा पूर्ण करुन प्रथम क्रमांक पटकाविला. इंगळे गणेश याने थाळीफेक स्पर्धेत द्वितीय स्थान मिळविले. ढाले दीपक याने गोळाफेक स्पर्धेत द्वितीय बक्षीस प्राप्त केले. कुंभार नारायणर याने लांबऊडीत दुसरे बक्षीस मिळविले.

■ दि. ९ ऑक्टो. २०११ रोजी झालेल्या तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या स्पर्धेत साळवे आनंता, ढाले दीपक, चौधरी अशोक, चाळके सचिन, केदारखुंटे गणेश, लिपणे काशीनाथ, लाटे सुनिल, लिपणे सचिन, साळवे राधाकिशन, बुधवंत अमोल, लिपणे ज्ञानेश्वर यांनी प्रथमक्रमांक पटकाविला.

■ दि. १० ऑक्टो. २०११ रोजी र.च. सोनटक्के विद्यालय, नवागढ येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय योगासन स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. या विजयी संघात कु. कुलकर्णी अमृता, झोल रामेश्वर, क्षीरसागर उमेश, काष्टे मनोजकुमार, देशपांडे माधव, देशमुख ऋषीकेश यांचा सहभाग होता.

■ दि. ११ ऑक्टो. २०११ रोजी जालना येथे झालेल्या विभागीय व्हॉलीबॉल निवड चाचणी मद्ये सहजराव राजवैभव याने सहभाग घेतला.

■ दि. १२ ऑक्टो. २०११ रोजी परळी जि.बीड येथे झालेल्या विभागीय शालेय योगासन स्पर्धेत कु.कुलकर्णी अमृता, क्षीरसागर उमेश, काष्टे मनोजकुमार, देशपांडे माधव यांनी परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले. कु.कुलकर्णी अमृता हिने या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.

■ दि. ११ ते १३ ऑक्टो. २०११ या कालावधीत परभणी येथे शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या महिलांच्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत कदम रोशनी हिचा सहभाग होता.

■ दि. १५,१६ ऑक्टो. २०११ या कालावधीत नेताजी सुभाष सैनिकी शाळा, परभणी येथे जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत आपल्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला. या विजयी संघात साळवे अनंता, ढाले दीपक, चौधरी अशोक, चाळके सचिन, केदारखुंटे गणेश, लिपणे काशीनाथ, लाटे सुनिल, लिपणे सचिन, साळवे राधाकिशन, बुधवंत अमोल, लिपणे ज्ञानेश्वर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

■ दि. १७ ऑक्टो. २०११ रोजी महाविद्यालयात जिल्हास्तरीय टेनिस व्हॉलीबॉल निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले.

■ १८ ऑक्टो. २०११ रोजी परभणी येथे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत राठोड देविदास याने १०० मी धावणे व २०० मी.

धावणे इंगळे गणेश याने थाळीफेक स्पर्धेत ढाले दीपक ३००० मी. धावणे व गोळाफेक, कुंभार नारायणर ८०० मी. धावणे व लांबऊडी, बुधवंत अमोल ४०० मी. धावणे यांनी सहभाग घेतला.

■ दि. २० ऑक्टो २०११ रोजी विभागीय क्रीडा संकुल औरंगाबाद येथे विभागीय तलवारबाजी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत देशमुख नारायण याने प्रथम क्रमांक पटकाविला तर सहजराव राजवैभव याने सहभाग नोंदविला.

■ दि. २०,२१ ऑक्टो. २०११ या कालावधीत वसमत जि. हिंगोली येथे विभागीय शालेय खो-खो स्पर्धेचे आयोजन केले गेले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने परभणी जिल्ह्याचे नेतृत्त्व केले. यात सहभागी खेळाडू, साळवे आनंता, ढाले दीपक, चौधरी अशोक, चाळके सचिन, केदारखुंटे गणेश, लिपणे काशीनाथ, लाटे सुनिल, लिपणे सचिन, साळवे राधाकिशन, बुधवंत अमोल, लिपणे ज्ञानेश्वर होते.

■ दि. २२,२३ ऑक्टो. २०११ या कालावधीत गंगापूर जिल्हा औरंगाबाद येथे राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत म.इम्तीयाज, सहजराव राजवैभव, अंभुरे आकाश, झाडे प्रियंका यांनी सहभाग घेतला व राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यात हा संघ तिसरा आला व खेळाडुंनी ब्रॉंझ पदक पटकाविले.

■ दि. २९ ऑक्टो. २०११ पासून सांगली येथे राज्यसंघटनेच्या वतीने खो-खो स्पर्धा घेण्यात आल्या. सदरील स्पर्धेत साळवे आनंता, चौधरी अशोक, लाटे सुनिल यांनी सहभाग घेतला.

■ दि. २९ ऑक्टो. ते ०३ नोव्हे. २०११ या कालावधीत टेबलटेनिस संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय टेबलटेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत देशमुख गोपी, शेळके अभिलाष यांनी सहभाग घेतला.

■ दि. १८ नोव्हें. २०११ ते २० नोव्हें. २०११ या कालावधीत अकोला येथे झालेल्या राज्यस्तरीय सिनियर बॉक्सींग स्पर्धेत झोल रामेश्वर याने सहभाग घेतला.

■ दि. १९,२० नोव्हे. २०११ आंबगाव जि.गोदिंया येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत कु. कुलकर्णी अमृता हिने औरंगाबाद विभागाचे नेतृत्व करीत सहभाग नोंदविला.

■ दि. २० ते २२ नोव्हे. २०११ या कालावधीत नंदुरबार येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय खो-खो निवड चाचणीत साळवे आनंता याने सहभाग घेतला.

■ दि. ३,४ डिसें. २०११ या कालावधीत श्रीराम प्रतिष्ठान सेलू येथे झालेल्या राज्यस्तरीय रोपजम्प स्पर्धेत सहजराव राजवैभव, क्षीरसागर उमेश यांनी सहभाग घेतला.

याच ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय किकबॉल स्पर्धेत म.इम्तीयाज, राठोड स्वप्नील, सहजराव राजवैभव, देशमुख ऋषीकेश, देशमुख नारायण, पोकळे दीपक, सोनुने हरी, तडवी सुफेन, तडमल अक्षय, सोसे सुनिल, मुके गोवर्धन, सिकची शुभम, इंगोले रोहन यांनी सहभाग घेतला.

तर राज्यस्तरीय सर्कल कब्बडी स्पर्धेत राठोड राजु, शिंदे सचिन, जाधव विठ्ठल, पौळ महादेव, पौळ श्रीकृष्ण, गडदे कैलास, राठोड बालु, देशमुख श्रीकांत यांचा सहभाग होता.

■ दि. ८ ते ११ डिसे. २०११ या कालावधीत सिक्रेट हार्ट वरप, कल्याण येथे झालेल्या राज्यस्तरीय सालेय तलवारबाजी स्पर्धेत औरंगाबाद विभागाचे नेतृत्व देशमुख नारायण याने केले. त्याने इपी या सांघिक गटात रौप्यपदक पटकाविले तर वैयक्तिक इपी गटात त्याने अटीतटीच्या लढतीत जिंकून सुवर्णपदक प्राप्त केले. व त्याची निवड महाराष्ट्राच्या संघात झाली.

■ दि. १० डिसे. २०११ रोजी खो-खो संघटनेच्या वतीने सांगली येथे मा. उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार व नामदार पतंगराव कदम यांच्या हस्ते गतवर्षीचा राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत गोल्डमेडल मिळवून विजयी ठरलेला साळवे आनंता याचा रोख रक्कम ५००१ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ही आमच्या दृष्टीने गौरवास्पद कामगिरी आहे.

■ दि. १३ ते १६ डिसे. २०११ या कालावधीत अकोला येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धेत ४६ ते ४९ किलो वजनी गटात झोल रामेश्वर याने औरंगाबाद विभागाचे प्रतिनिधीत्व केले तर मुलींच्या गटात कु. शेंडगे स्वामी हिने औरंगाबाद विभागाचे नेतृत्व करीत ५४ ते ५७ किलो वजनी गटात संघर्ष करीत रौप्यपदक प्राप्त करुन ती राज्यस्तरावरील द्वितीय बक्षीसाची मानकरी ठरली.

■ दि. २९ डिसे. २०११ ते ३ जाने. २०१२ या कालावधीत औरंगाबाद येथे सुरु झालेल्या राष्ट्रीय तलवारबाजी प्रशिक्षण शिबीरात देशमुख नारायण याने प्रशिक्षण घेतले व दि. ५ ते ७ जाने. २०१२ या कालावधीत चंदीगढ (पंजाब) येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करीत रौप्यपदक प्राप्त केले व तो भारतात तिस-या क्रमांकावर राहिला. देशमुख नारायण याची ही कामगिरी आमच्या दृष्टीने अभिमानाची आहे.

■ दि. १२ ते १६ जाने. २०१२ या कालावधीत अमरावती येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरीलल चर्चासत्रात प्रा.नागेश कान्हेकर यांनी सहभाग घेतला.

■ दि. २३ ते २६ जाने. २०१२ या कालावधीत कांदिवली मुंबई येथे राज्यस्तरीय संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत बिडवे पंकज, आकात अमोल यांनी सहभाग घेतला.

कल्याण, मुंबई येथे टेनिस व्हॉलीबॉल संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या वरिष्ठ गट (पुरुष) राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत म. इम्तीयाज, इंगोले आनंद, जोरगेवार दीपक, घायतडक ऋषीकेश यांनी सहभाग घेतला.

## गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना

अध्ययन अध्यापन प्रक्रियेची फलनिष्पत्ती म्हणजे यश असते. प्रेरणा प्रोत्साहन आणि कौतुकामुळे यशाची एक वेगळीच रंगत असते. यशाचे असे रंगतदार इंद्रधनुष्य म्हणजे महाविद्यालयातील गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना आहे.

या योजनेची कल्पना एका साध्या पण लक्षवेधी प्रसंगातून साकारली. महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य द.रा.कुलकर्णी सर यांना राज्य शासनाचा आदर्श शिक्षक

सन्मान मिळाला. तेव्हा त्यांच्या सत्कार समारंभातून आपल्या गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांचे देखील असेच सन्मान कौतुक करावे ज्या योगे नंतरच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा, प्रोत्साहन मिळेल ही सद्‌भावना घेऊन सर्व शिक्षकांनी स्वयंस्फूर्तपणे योजनेसाठी आर्थिक योगदान दिले. त्यास अनेक मान्यवरांनी देणगी देऊन सकारात्मक प्रतिसाद दिला. म्हणून प्रतिवर्षी गुणवत्ता सन्मान पारितोषिक वितरण सोहळा संपन्न होतो.

